दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.०४ जानेवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाची कारवाई, चकमकीत १४ माओवादी ठार

बिजापूर दि.३ (वृत्तसंस्था)- छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाने केलेल्या कारवाईमध्ये १४ माओवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. छत्तीसगडच्या सुकमा आणि बिजापूर जिल्ह्यात शनिवारी सकाळी सुरक्षा दलाच्या जवानांनी दोन ठिकाणी वेगवेगळी कारवाई केली. या दोन्ही ठिकाणच्या कारवाईत एकूण १४ माओवादी ठार झाले आहेत.

तसेच सुरक्षा दलांकडून अद्यापही शोध मोहीम सुरू असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. या चकमकीत ठार झालेल्या माओवाद्यांमध्ये ८ लाख रुपयांचं बक्षीस असलेला नक्षलवादी कमांडर मंगडू याचाही समावेश आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी माओवाद संपवण्यासाठी मार्च २०२६ ची अंतिम मुदत दिलेली आहे. त्या पार्श्नभूमीवर सुरक्षा दलाकडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सुकमा जिल्ह्याच्या दक्षिणेकडील एका जंगलात सुरक्षा दलांचं एक संयुक्त पथक ही कारवाई करत होतं. पहाटेपासून गोळीबार सुरू झाला होता आणि तो अधून-मधून सुरूच होता. या कारवाईनंतर घटनास्थळावरून अनेक मृतदेह सापडले आहेत. तसेच हे ऑपरेशन अद्याप संपलेलं नसून पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

# राज्यातील बिनविरोध निवडणुकांची चौकशी होणार

## राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश, विजयी नगरसेवक रडारवर!

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील २९ महापालिका निवडणुकींसाठी मतदान होण्यास अवघे १२ दिवस शिल्लक आहेत आणि निकाल जाहीर व्हायला १३ दिवस बाकी आहेत. मात्र, या निवडणुकांआधीच राज्यभरात एकूण ६७ उमेदवारांची नगरसेवकपदी बिनविरोध निवड झाली आहे. मात्र मुंबईसह राज्यातील बिनविरोध निवडणुकांची चौकशी करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. विरोधी उमेदवारांवर दबाव, आमिष किंवा जबरदस्ती करून नामनिर्देशन मागे घेण्यास भाग पाडले गेले का, याची तपासणी करण्यात येणार आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडींची विजय घोषणा केली जाणार नाही, अशी माहितीही राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे.

केडीएमसीत भाजपचे १४ व शिवसेना शिंदे गटाचे ६ उमेदवार, तसेच पिंपरी-चिंचवड, जळगाव, छत्रपती संभाजीनगर येथे किमान एक भाजपा उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. कुलाबातील तीन प्रभागांत काँग्रेस, जनता दल (एस) व आपचे उमेदवारांनी दबावाखाली नामनिर्देशन न स्वीकारल्याचा आरोप केला असून या प्रकरणाचीही चौकशी होणार आहे. आयोगाने मुंबई महापालिका आयुक्त व वॉर्ड 'ए' कार्यालयातील फुटेज तपासण्याचे निर्देश दिले आहेत. नियमभंग सिद्ध झाल्यास निवडणूक अधिकाऱ्यावर कारवाई होऊ शकते. मात्र उमेदवारांना पुन्हा नामनिर्देशन दाखल करण्याची तरतूद नाही. २ जानेवारी (नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख) नंतर संबंधित परतावा अधिकारी, महापालिका आयुक्त व पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागवले जातील.




निवडणुका बिनविरोध करण्यात भाजपाने आघाडी घेतली अजून आतापर्यंत भाजपाचे ४५ उमेदवार बिनविरोध विजयी झालेत. त्यापाठोपाठ निवडणुका बिनविरोध करण्यात शिंदेंच्या शिवसेनेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. शिंदेंच्या शिवसेनेते तब्बल १९ नगरसेवक बिनविरोध विजयी झालेत. कल्याण-डोंबिवलीत भाजपचे सर्वाधिक १५ उमेदवार तर शिवसेनेचे ६ उमेदवार बिनविरोध विजयी झालेत. त्यानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे २ तर मालेगावमधून इस्लाम पार्टीच्या एक उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.

दरम्यान, राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे.

# अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप!

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे विधान

पिंपरी दि.३ (प्रतिनिधी)- 'उपमुख्यमंत्री अजित पवार हे भाजपसोबत कशापद्धतीने जोडले गेले, हे सर्वांना माहिती आहे. त्यांना सोबत घेण्याबाबत पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पक्षाचे पदाधिकारी मला थोडा विचार करा म्हणून सांगत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मी नेहमी खासगीत सांगायचे की थोडा विचार करावा. आता पवार यांना सोबत घेत असल्याचा पश्चाताप होत असल्याचे', मोठे विधान भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शनिवारी निगडीत केले. कोणाच्या जीवावर कोण काय बोलतोय, असा सवालही त्यांनी केला.

पिपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ चव्हाण यांच्या हस्ते शनिवारी निगडीतील भक्ती-शक्ती चौक येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, अमित गोरखे, उमा खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी खासदार अमर साबळे, माजी महापौर संजोग वाघेरे यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी महापालिकेतील भाजपच्या राजवटीतील कारभारावर गंभीर आरोप केले होते. त्याला चव्हाण यांनी शनिवारी प्रत्युत्तर दिले.

चव्हाण म्हणाले, 'निवडणुकीत खोटे कथानक पसरविण्यासाठी काही खासगी संस्था सल्ला देतात. अजित पवार हे केंद्र, राज्यात आमच्यासोबत जोडले आहेत. या निवडणुकीमध्ये त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. सल्ला देणाऱ्या संस्थेने (एजन्सी) सांगितल्याशिवाय पवार खोटे आरोप करणार नाहीत. त्यांचे सर्व आरोप खोटे आहेत. आम्ही खाणार नाही, कोणाला खाऊ देणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पारदर्शकपणे काम होईल, याकडे केंद्र, राज्यातील नेत्यांचे लक्ष असते. निवडणुकीनंतर ते झाले होते, जाऊ दे असे पवार हसतहसत म्हणतील. सध्या खोटे बोल पण रेटून बोल, या पद्धतीने ते चालले आहेत. भाजपची संघटनेची ताकद चांगली आहे. मतदार सुज्ञ असून विकासाला प्राध्यान्य देईल. महापौर भाजपचाच होईल'.

पवार यांनी केलेले आरोप स्थानिक आमदारांनी का फेटाळले नाहीत, असे विचारले असता चव्हाण म्हणाले, 'उपमुख्यमंत्री पदावर असलेला एवढा मोठा माणूस आरोप करतो. (पान ४ वर)

## राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला ३७.५ वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीनंतर आज सेवानिवृत्त झाल्या. मुंबईतील नायगाव पोलिस मैदानावर आयोजित एका सोहळ्यात त्यांना निवृत्तीनिमित्त गार्ड ऑफ ऑनर देऊन मानवंदना देण्यात आली. १९८८ च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी असलेल्या शुक्ला यांनी आपल्या कार्यकाळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखल्याचे समाधान व्यक्त केले. रश्मी शुक्ला यांच्या निवृत्तीनंतर राज्याच्या पोलिस महासंचालकपदाची धुरा आता सदानंद दाते यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना रश्मी शुक्ला सर्वांचे आभार मानले. "गेली दोन वर्षे महाराष्ट्र पोलिसांचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली, हा माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. या काळात राज्यातील सण-उत्सव शांततेत पार पडले आणि निवडणुकाही विनाअडथळा पार पडल्या. विशेषतः गडचिरोली आणि गोंदियातील नक्षलग्रस्त भागांत झालेली सुधारणा आणि नक्षलवाद्यांच्या संख्येत झालेली घट, हे संपूर्ण पोलिस दलाचे यश आहे," असे त्या म्हणाल्या.

# फ्लड डायव्हर्शनचा पहिला टप्पा लवकरच, शहरांना पुरापासून मिळणार संरक्षण अन् दुष्काळी भागाला पाणी-मुख्यमंत्री फडणवीस

सांगली दि.३ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगलीत भाजपच्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी त्यांनी सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी फ्लड डायव्हर्शन प्रकल्पाचा पहिला टप्पा लवकरच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले. फ्लड डायव्हर्शन प्रकल्पामुळे सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण होईल. हे पाणी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागाकडे वळवले जाईल. यामुळे एकीकडे आपल्या शहरांना पुराच्या पाण्यामुळे संरक्षण मिळेल आणि दुसरीकडे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जिवनदान मिळेल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे. त्या निमित्ताने मी सांगलीतून भाजपच्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी एकदा सांगलीत आले होते. तेव्हा ते



म्हणाले होते, सांगली सर्वात चांगली. त्यामुळे मी ठरवले की, महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ मुंबईत सायंकाळी होईल. पण तत्पूर्वी, सांगलीतून भाजपच्या प्रचाराचा शुभारंभ करण्याचा निर्णय आम्ही घेतला. मागच्या महापालिका निवडणुकीत मी सांगलीत आलो होतो. तेव्हा काही आश्वासने दिली होती. तसेच जनतेला भाजपच्या ताब्यात महापालिका सोपवण्याचे आवाहनही केले होते. त्यानंतर महापालिकेची सूत्रे भाजपच्या हातात आली. त्यानंतर आम्ही दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

मुख्यमंत्री म्हणाले, सांगली व कोल्हापुरात आलेल्या महापुरात अमाप नुकसान झाले. त्यानंतर आम्ही फ्लड डायव्हर्शनचा (पान ५ वर)

## भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत आहे. भगवान बुद्ध सर्वांचे आहेत आणि ते सर्वांना जोडून ठेवतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीतल्या राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात, भगवान बुद्धांशी संबंधित, पवित्र पिप्रावा अवशेषांच्या, भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सव्वाशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे अवशेष भारतात परत आल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी आनंद व्यक्त केला.हे अवशेष भारताबाहेर नेणाऱ्यांसाठी त्या फक्त निर्जीव वस्तू होत्या, म्हणून या वस्तूंचा लिलाव करायचा प्रयत्न त्यांनी केला, पण भारतानं तसं होऊ न देता भगवान बुद्धांच्या कर्मभूमीत हे अवशेष परत आणले, असं प्रधानमंत्री म्हणाले. भगवान बुद्धांशी संबंधित विविध ठिकाणी असलेले त्यांचे अवशेष म्हणजे त्यांच्या संदेशाचं जिवंत प्रतीक आहे, असं त्यांनी सांगितलं. भारताने हे अवशेष विज्ञान आणि अध्यात्म या दोन्ही दृष्टींनी सांभाळून ठेवले आहेत, तसंच जगभरात अशा प्रकारच्या ठिकाणांच्या विकासासाठी शक्य होईल ते योगदान देण्याचा भारताचा प्रयत्न आहे, असंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, किरेन रिजिजू, रामदास आठवले, दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना, दिल्ली सरकारमधले मंत्री, बौद्ध धर्माचे प्रतिनिधी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

## भाजपच्या बिनविरोध पॅटर्नची मनसेकडून पोलखोल होणार; राज ठाकरेंचं पुन्हा 'लाव रे तो व्हिडिओ'

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यात भाजप शिवसेना महायुतीकडून सुरू असलेल्या बिनविरोध निवडणुकांचा पॅटर्न लोकशाहीसाठी घातक असून विरोधकांनी एकत्र येत आवाज उठवायला सुरु केली आहे. ठाणे, कल्याण डोंबिवलीसह राज्यात निवडून आलेल्या ७० बिनविरोध निवडून उमेदवारांची सध्या राज्यभर जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामध्ये, सर्वाधिक भाजपचेच आहेत. दबाव, पैशाचं आमिष दाखवून उमेदवारांना निवडणुकीतून माघार घ्यायला लावल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे ठाण्यात मनसेच्या एका उमेदवारानेही निवडणुकीतून माघार घेतल्याने मनसैनिकांना हा मोठा धक्का होता, त्यामुळे बिनविरोध झालेले हे उमेदवार कसे निवडून आले आहेत? याची पोलखोल येणाऱ्या सभांच्या माध्यमातून राज ठाकरे करणार आहेत.

राज ठाकरे आगामी प्रचार संभांमधून कॉल रेकॉर्ड आणि व्हिडिओच्या माध्यमातून अनेक महत्त्वाचे पुरावे जनतेसमोर आणणार आहेत. कारण, राज ठाकरे यांच्याकडे ठाणे आणि कल्याण डोंबिवलतील नेत्यांनी हे पुरावे सुपूर्द केले असल्याची माहिती आहे. तसेच, महानगरपालिकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या प्रकरणी राज ठाकरेंच्या नेतृत्वात मनसे आक्रमक झाली आहे. या सगळ्याप्रकरणी येत्या सोमवारी मनसे बिनविरोध उमेदवार आणि त्यांच्या जागांबाबत कोर्टात जाणार आहे. तसेच सोमवारी या सगळ्या प्रकरणी मनसेचे प्रमुख नेते राज्य निवडणूक आयुक्तांची भेटही घेणार आहेत.

राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी मतदान होण्यास अवघे १२ दिवस शिल्लक आहेत आणि निकाल जाहीर व्हायला (पान ४ वर)

## ठाकरे बंधूंचा जाहीरनामा म्हणजे 'भूलथापा', शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांची टीका

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंकडून नुकताच जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. मात्र, त्या जाहीरनाम्यावर विरोधी पक्षाने टीका करण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेच्या अधिनियमात न बसणाऱ्या गोष्टींचे सादरीकरण करून आदित्य ठाकरे व अमित ठाकरेंचे अर्धवट ज्ञान दिसून आले, अशी टीका शिवसेना सरचिटणीस व माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केली. पालकांनी युवराजांना थोडे समजावून आणि अभ्यास करून पाठवायला हवे होते, असा टोलाही त्यांनी लगावला.

जाहीरनाम्यातील गोष्टी २० आमदार आणि ८ खासदारांच्या जोरावर पूर्ण करणे शक्य नाही. त्यामुळे त्यांच्या भूलथापांना बळी पडू नका, असेही शेवाळे यांनी नमूद केले.आदित्य आणि अमित ठाकरे यांनी जाहीर केलेल्या वचननाम्यात घरकाम करणाऱ्या महिलांना दीड हजार रुपये, ७०० चौरस फुट घराला मालमत्ता कर माफ, प्रत्येक विधानसभा क्षेत्रात पाळणाघर, पालिकेच्या शाळांमध्ये ज्युनिअर कॉलेज, महापालिकेच्या वाहनतळाची मोफत सुविधा, १०० युनिटपर्यंत मोफत वीज, तरुणांना (पान ४ वर)

## महायुतीत वादाची ठिणगी? 'आम्हाला दमात अन् हलक्यात घेऊ नका', चंद्रकांत पाटलांचा अजित पवारांना अप्रत्यक्ष इशारा

पुणे दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या प्रचाराच्या निमित्ताने महायुतीच्या नेत्यांमध्येच वादाची ठिणगी पडल्याचं चित्र दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर बोलताना 'पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर भ्रष्टाचाराचा कळस गाठला गेला. स्थानिक नेत्यांची राक्षसी भूक दिसून आली' अशी टीका केली होती. त्यांच्या या टिकेनंतर आता भाजपाच्या नेत्यांकडून अजित पवारांना इशारा देण्यात येत आहे.

अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप असल्याचं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं. त्यानंतर आता भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांनी एका कार्यक्रमात बोलताना अजित पवारांना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. 'आम्हाला दमात आणि हलक्यात घेऊ नका. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देखील आमच्याकडेच आहे', असं म्हणत चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांना सुनावलं आहे.

"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्यासमोर निवडणुकीचं एक धोरणं मांडलं. ही निवडणूक आपल्याला विकासावर न्यायची आहे. महायुतीमधील नेत्यांनी एकमेकांवर अजिबात टीका करायची नाही. मात्र, टीका करायला सुरुवात झाली. ही टीका किती चालणार? कुठे थांबणार? याचा अंदाज घेऊ. मागच्या नगरपरिषदांच्या निवडणुकीत टीका करणाऱ्यांनी म्हटलं होतं की तिजोरीची चावी आमच्याकडे आहे, त्यानंतर मी भोरमधील एका सभेत म्हटलं होतं की तिजोरीची चावी तुमच्याकडे आहे, पण तिजोरीचा मालक आमच्याकडे आहे", असं म्हणत चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष (पान ४ वर)

## पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या १७१ जागा वाढल्या, एनएमसीकडून अतिरिक्त जागांना मंजुरी

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- वैद्यकीय मूल्यांकन आणि क्रमवारी मंडळाच्या (एमएआरबी) निर्णयाविरोधात वैद्यकीय महाविद्यालयांनी केलेल्या अर्जानंतर राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (एनएमसी) अतिरिक्त १७१ पदव्युत्तर वैद्यकीय जागांना मंजुरी दिली. या मंजुरीमुळे २७ वैद्यकीय महाविद्यालयांच्या पदव्युत्तर प्रवेश क्षमतेत वाढ होणार आहे.शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये एमएआरबीने मंजूर केलेल्या जागांच्या निर्णयाविरोधात काही वैद्यकीय महाविद्यालयांनी एनएमसी अधिनियम, २०१९ च्या कलम २८ (५) अंतर्गत अपील केले होते.

या अपीलाबाबत प्रथम अपील समितीने विचारविमर्श करून १७१ जागांना मंजुरी देण्याचा निर्णय घेतला. अपील समितीने विविध वैद्यकीय शाखांमध्ये जागांना मान्यता दिल्याने २७ वैद्यकीय महाविद्यालयांच्या पदव्युत्तर प्रवेश क्षमतेत वाढ होणार आहे. यामध्ये एमडी जनरल मेडिसिन, एमडी रेडिओ-डायग्नोसिस, एमडी पेडियाट्रिक्स, एमएस जनरल सर्जरी, एमएस ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकोलॉजीसह अनेक एमडी व एमएस अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

या मंजूर पदव्युत्तर जागांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे लेटर ऑफ परमीशन (एलओपी) लवकरच जारी करण्यात येणार आहे. समुपदेशन प्रक्रियेत या जागांचा समावेश करण्यासाठी समुपदेशन प्राधिकरणांनी संस्थांकडून एलओपीची प्रतीक्षा करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली ही यादी समुपदेशन प्रक्रियेसाठी वैध दस्तऐवज म्हणून ग्राह्य धरली जाईल, असे एमएआरबीचे संचालक सुख लाल मीना यांनी सांगितले.

या अभ्यासक्रमांच्या जागांमध्ये वाढएमडी जनरल मेडिसिन आणि एमडी रेडिओ-डायग्नोसिस अभ्यासक्रमाच्या सर्वाधिक (पान ४ वर)

# वाजपेयी, मोदी, वसंतदादा, बॅरिस्टर नाथ पै, सुद्धा बिनविरोध निवडून आले नाहीत, पण महाराष्ट्रात ६०-६० नगरसेवक बिनविरोध होतात?

## राऊतांचा भाजप, शिंदेसेनेच्या बिनविरोध पायंड्यावर सडकून प्रहार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- या देशात मोठ्या मोठ्या नेत्यांना बिनविरोध निवडून दिलेलं नाही. अटल बिहारी वाजपेयी बिनविरोध निवडून आले नाहीत, बॅरिस्टर नाथ पै कधी बिनविरोध निवडून आले नाहीत, वसंत दादा पाटील बिनविरोध निवडून आले नाहीत, राम मनोहर लोहिया बिनविरोध निवडून आले नाहीत, नरेंद्र मोदी बिनविरोध निवडून आले नाहीत. मात्र, या महाराष्ट्रात बिनविरोध निवडून आणण्यासाठी साम, दाम दंड भेद वापरून नवीन ट्रेंड सुरू असल्याचा घणाघाती प्रहार संजय राऊत यांनी केला. देशाच्या नव्हे तर जगाच्या इतिहासामध्ये



इतके बिनविरोध लोक कधी निवडून आले नव्हते हे पत्रकारांना आणि राजकीय विश्लेषकांना माहिती आहे आणि लोकांनाही माहिती असल्याचे राऊत म्हणाले.

संजय राऊत म्हणाले की, जबरदस्तीने समोरच्या उमेदवारांना मागार घ्यायला लावायची, त्यासाठी निवडणूक यंत्रणाच नाही, तर समोरच्या उमेदवारांवर पैशांचा पाऊस पाडायचा. पाच-पाच कोटी दिल्याचे ते म्हणाले. कल्याणमध्ये बिनविरोध व्हावा आणि त्याने माघार घ्यावी म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर प्रमुख मनोज घरत यांना दिलेला आकडा आहे तो पाहता डोळ्याची बुबुळ बाहेर पाडणारा आहे. जळगाव येथील परिस्थितीबद्दल बोलताना ते म्हणाले की, जळगावला उमेदवाराने माघार घ्यावी म्हणून त्यांच्या घराघरामध्ये पाच पाच कोटीच्या बॅगा गेल्या. उमेदवारांचे डोळे फाटायची वेळ आली. प्रचंड पैशाचा खेळ या लोकशाहीमध्ये कधीच झाला नव्हता, असे ते म्हणाले.

बिनविरोध करण्यासाठी निवडणूक यंत्रणेचा वापर कसा केला गेला, हे सांगताना ते म्हणाले की, निवडणूक यंत्रणाला स्पष्ट सूचना होत्या. तीन वाजेपर्यंत माघारीची वेळ होती पण त्यानंतर सुद्धा माघारीसाठी कोणी अर्ज घेऊन आले तर ते स्वीकारा आणि तीन वाजल्याच्या आधीची वेळ काढून टाका या स्पष्ट सूचना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना काल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आलेल्या आहेत. ते म्हणाले की, या सगळ्यांचे फोन कॉल, (पान ४ वर)

# खासगीकरणासोबत अंकुशही महत्त्वाचा

इंडिगोने शेकडो उड्डाणे रद्द करून हजारो प्रवासी विमानतळांवर त्याप्रसंगी अडकवले होते. त्यांच्या प्रवास योजनांचा घोळ घातला आणि संपूर्ण देशातील हवाई वाहतूक अक्षरशः कोलमडून टाकली. पण ही घटना हा एक अपघात नाही; आज संपूर्ण खासगीकरण खरेच कसे मारक आहे ते आपल्याला शिकवून गेले आहे. जे अंधाधुंद खासगीकरण धोरणामुळे आज देशाच्या संपूर्ण विमानवाहतूक उद्योगाला पोखरले त्याचा धडा आताच आपण घेतला पाहिजे. विमान प्रवासी अडकले त्यांचे हाल झाले, नुकसान झाले आपल्याला त्याचे काय या भ्रमात आपण राहिलो तर हे संकट आपल्याही दारी लवकरच कधी येऊन ठेपेल याचा थांगपत्ताही आपल्याला राहणार नाही.

भारताच्या आकाशात एकही सरकारी मालकीची एअरलाईन शिल्लक राहिलेली नाही. एकेकाळी राष्ट्राची शान मानली गेलेली एअर इंडिया सुद्धा अखेर खासगी उद्योगसमूहाच्या हवाली झाली आणि त्यानंतर संपूर्ण विमानवाहतूक प्रणाली इंडिगो, एअर इंडिया, स्पाइसजेट, विस्तारा, एअर इंडिया एक्स्प्रेस, अकासा एअर, स्टार एअर यांसारख्या केवळ खासगी कंपन्यांच्या ताब्यात आली आहे. या सर्व कंपन्या नुसत्याच खासगी नाहीत, तर सरकारने 'विकास' नावाखाली केलेल्या राष्ट्रीय संसाधनांच्या मोठ्या प्रमाणातील हस्तांतरणाचे थेट उत्पादक आहेत. आज देशात प्रवाशांची सेवा करणे, हवाई नेटवर्क राखणे, आपत्कालीन परिस्थितीत वाहतूक सांभाळणे या सर्व राष्ट्रीय भूमिकांची दोरी पूर्णपणे खासगी संस्थांच्या मुठीत आहे, ज्या नफ्याच्या शिवाय इतर कोणत्याही भावनेने कार्य करत नाही. टाटासारख्या कंपनीचं सुद्धा समाजसेवेसाठी एक नावलौकिक होता मात्र ती सुद्धा एअर इंडिया विकत घेतल्यानंतर पूर्णपणे नफेखोरीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. इंडिगोसारखी कंपनी, जी देशाच्या हवाई बाजारपेठेत साठ टक्क्यांहून अधिक वाटा घेऊन बसली आहे, ती एका क्षणात ठप्प झाली तर काय होते हे मागील काही दिवसांत देशाने प्रत्यक्ष पाहिले. एकाधिकार वाढू दिल्याचा, सार्वजनिक सेवा धोरणाची वाट लावल्याचा आणि खासगी कंपन्यांना बेभान मुभा दिल्याचा हा जिवंत पुरावा आहे. खासगीकरणाचे समर्थक म्हणून सरकार हे सर्वसामान्यांना 'स्पर्धा वाढेल, सुविधा सुधारतील' असा भ्रम दाखवते, पण व्यवहार दाखवतो की उलटपक्षी भारतीय विमान वाहतूक क्षेत्र आज स्पर्धेमुळे नव्हे, तर मोजक्या दोन-तीन कंपन्यांच्या मक्तेदारीमुळे उभा आहे आणि त्याचा सर्वात जास्त फटका जनतेलाच बसतो.

गेल्या दशकात आपल्या देशातील विमानतळे, विमान कंपन्या, रेल्वेचे काही विभाग, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा या सर्वांना विक्रीस काढून दिले गेले. सरकारने सार्वजनिक संस्थांचे रक्षण करण्याऐवजी त्यांना 'नफा नाही म्हणून' एका हाताने बंद करून दुसऱ्या हाताने उद्योगपतींना बहाल केले. या विसंगत धोरणांचा परिणाम असा, की आज देशातील विमानसेवा पूर्णतः नफ्यावर चालणाऱ्या व्यवसायिक कंपन्यांच्या दयेवर अवलंबून आहे. त्या कंपन्या नफा झाला तर विमान उडतील; नफा कमी झाला तर उड्डाणे रद्द होतील, मार्ग बंद होतील आणि प्रवासी अडचणीत येतील इतकेच नव्हे तर राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजाही बाजूला पडतील. आज इंडिगोसारखी कंपनी संकटात आली तर देशभरातील विमान वाहतूक ठप्प होते, उद्या एअर इंडिया, स्पाइसजेट किंवा विस्तारा आर्थिक घसरणीत गेल्या तर संपूर्ण हवाई सेवा उद्ध्वस्त होऊ शकते. एवढ्या मोठ्या राष्ट्राच्या आकाशातील सेवा जर अशा कमकुवत पायावर उभी केली तर देशाची जागतिक प्रतिष्ठा, व्यापारी हालचाल, पर्यटन आणि करोडो लोकांचे रोजचे व्यवहार एका क्षणात ढासळू शकतात. ही कल्पनाच तितकीच भीषण आहे जितकी तिची शक्यता खरी आहे. या सर्व समस्यांच्या मुळाशी सरकारचे एकच धोरण दिसते. खासगीकरण. लोकहितापेक्षा उद्योगहिताला प्राधान्य देत, सार्वजनिक संस्थांच्या पायावर उभी राहिलेली राष्ट्रीय संपत्ती औद्योगिक समूहांना भेट दिली गेली. परिणामी आज विमान वाहतूक ही सार्वजनिक नाही, तर पूर्णपणे खासगी मालमत्ता बनली आहे. सरकारकडे ना नियंत्रण, ना थेट हस्तक्षेप करण्याची क्षमता उरली आहे. देशाच्या सुरक्षेला, नागरिकांच्या सेवेला आणि सार्वजनिक हिताला अनुल्लंघनीय असणारा हा निर्णय आज किती घातक ठरत आहे, हे इंडिगोच्या अराजकाने स्पष्ट दाखवून दिले आहे.भारतासारख्या विशाल आणि वेगाने विकसित होणाऱ्या राष्ट्रात विमान वाहतूक ही केवळ उद्योग नसून राष्ट्रीय गरज आहे. तिला मजबूत पायावर उभे करण्यासाठी सार्वजनिक नियंत्रण, कठोर नियमन, एकाधिकार रोखण्यासाठी प्रभावी धोरण आणि आवश्यक असल्यास नव्याने एक राष्ट्रीय विमान कंपनी पुन्हा उभारणे याची अत्यंत गरज आहे.

आज खरंच एक तरी सरकारी विमान कंपनी असावी असा सर्वत्र असलेला सूर बरेच काही सांगून जात आहे. केंद्र सरकारच्या यंत्रणांनी सध्या सर्व विमान कंपन्यांना भाडेवाढीची मुभा दिली आहे. त्यामुळे ठरावीक गर्दीच्या काळात अमाप भाडेवाढ केली जाते. जेव्हा एअर इंडिया ही सरकारी कंपनी होती तेव्हा सर्वच विमान कंपन्यांचे त्यांच्या दरांवर नियंत्रण होते, मात्र एअर इंडिया खासगी झाली आणि तीही खासगी विमानसेवांसारखी इतर खासगी सेवांप्रमाणे भाडेवाढ करू लागली म्हणून इतर विमान सेवांनाही कोणताही धरबंद राहिला नाही. विमान सेवा पुरतीच कोलमडल्याने त्याचा ताण रस्ते वाहतुकीवर व रेल्वे वाहतुकीवरही पडलेला दिसून आला. खासगीकरणाचे जसे फायदे आहेत तसेच त्याचे तोटे ही आहे. आज एसटीत तरी खासगीकरण अजूनही तेवढे मुरलेले नाही. मात्र आज मुंबईची बेस्टची अवस्था ही संपूर्णपणे खासगीकरणाच्या दिशेने निघाली आहे, यावर 'दैनिक प्रहार'ने वारंवार आपल्या लेखणीतून यावर मतप्रदर्शन केले. खासगीकरण मर्यादित ठेवत सरकारी नियंत्रण किती आवश्यक आहे तेही वारंवार पटवून दिले.

आज मुंबईच्या बेस्ट बसचे ९० टक्के खासगीकरण झाले असून फक्त बेस्टच्या ताफ्यात २०० बस शिल्लक आहेत, त्याही आता पुढील एक-दोन वर्षांत निघून गेल्यानंतर संपूर्ण बस ताफा खासगी होणार आहे. सध्या बेस्ट मध्ये सात कंत्राटदार असून त्याद्वारे बस सेवा व काही प्रमाणात कर्मचारी पुरवले जातात. मात्र हे कर्मचारी कंत्राटी असल्याने त्यांच्यामध्ये वारंवार असंतोष निर्माण होतो व ते काम बंद आंदोलन पुकारतात याचाही बेस्टला अनुभव आला आहे. दुसरे म्हणजे आज इतर छोटे-मोठे कंत्राटदार सोडले तर सध्या एका मोठ्या कंत्राटदारांकडेच बेस्टची भविष्यात सूत्रे जाणार आहे हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे या कंत्राटदारांनी अचानक बस सेवा बंद केली तर काय होणार कारण? अशा कंत्राटदारांनी असमर्थता दर्शवली तर पुढे काय होणार याची कल्पनाही न केलेली बरी. आज एसटी महामंडळाकडे काही प्रमाणात खाजगी बस व त्यांचे कर्मचारी आहेत मात्र तरी एसटीने अजूनही संपूर्ण खासगीकरणाकडे आपली दिशा वळवलेली नाही. कारण एसटीही बंद पडली तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था बिघडून जाईल याची कल्पना सरकारला आणि एसटी महामंडळालाही आहे. सध्या तरी एसटीमार्फत स्वमालकीच्या बस गाड्या घेण्यास प्राधान्य दिले जात आहे. मात्र दुसरीकडे बेस्टचे वीज विभाग व परिवहन विभाग हे सुद्धा खासगीकरणाच्या दिशेने जात आहे.

उद्या जर अशीच वेळ आली तर बेस्ट उपक्रमाला खाजगी कंत्राटदारांच्या पुढे झुकून त्यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागतील, कारण तेव्हा बेस्टकडे स्वतःचा पर्याय राहणार नाही. सध्या बस सेवेवरील भाड्याचे कोणते नियंत्रण नाही. आज राजधानी दिल्लीत याच मॉडेलच्या बस सेवेची संख्या वाढल्याने दिल्लीकरांची ससेहोरपळ होत आहे. एक ठरावीक मर्यादेत खासगीकरण हे झालेच पाहिजे. मात्र प्रवासी नाडला जाऊ नये. नाहीतर इंडिगोचे जे झाले ते पाहता सरकारने उपाय म्हणून आणखी दोन नव्या विमान कंपन्यांना मंजुरी दिली. हा यावर खरच उपाय ठरेल का?

# ‘बाई’ या शब्दातून उमटणारी स्त्रीची सामाजिक ओळख

**मराठी** भाषेतील ‘बाई’ हा शब्द ऐकायला साधा, रोजच्या वापरातला वाटतो; पण तो जितका सहज आहे तितकाच तो अर्थछटांनी, सामाजिक संदर्भांनी आणि भावनिक पातळ्यांनी भरलेला आहे. हा शब्द केवळ एखाद्या स्त्रीसाठी वापरला जाणारा संबोधनवाचक शब्द नाही, तर तो समाजरचनेचा, संस्कृतीचा, स्त्रीच्या स्थानाचा आणि काळानुसार बदलत गेलेल्या मानसिकतेचाही आरसा आहे.

**शब्दार्थ आणि मूळ अर्थ**

‘बाई’ या शब्दाचा प्राथमिक अर्थ ‘स्त्री’ किंवा ‘महिला’ असा घेतला जातो. मराठी शब्दकोशानुसार ‘बाई’ म्हणजे स्त्रीलिंगी व्यक्ती, विशेषतः विवाहित स्त्री किंवा गृहिणी. ग्रामीण व पारंपरिक संदर्भात हा शब्द ‘पत्नी’, ‘घरातील स्त्री’, ‘सून’, ‘आई’ अशा भूमिकांशी सहज जोडला जातो. ‘अमुक तमुकाची बाई’ असा उल्लेख स्त्रीची स्वतंत्र ओळख कमी करून तिचे नाते पुरुषाशी जोडण्याची मानसिकता दर्शवतो.

**आदरार्थी आणि आपुलकीचा वापर**

इतिहासाकडे पाहिले तर ‘बाई’ हा शब्द अनेकदा आदरानेही वापरला गेला आहे. ‘ताराम तीबाई’, ‘माताबाई’, ‘जिजाबाई’, ‘यशोदाबाई’ अशा नावांमधून ‘बाई’ हा प्रत्यय स्त्रीच्या कर्तृत्वाला, मातृत्वाला आणि नेतृत्वाला सन्मान देतो. ग्रामीण भागात अजूनही ‘या बाई’, ‘त्या बाई’ असा उल्लेख उपहासाने नव्हे, तर ओळखीच्या, आपुलकीच्या भावनेने केला जातो. येथे ‘बाई’ हा शब्द स्त्रीच्या साधेपणाचे आणि समाजातील तिच्या स्थानाचे प्रतीक ठरतो.

**अवमानकारक अर्थछटा**

परंतु काळाच्या ओघात आणि विशेषतः शहरी संभाषणात ‘बाई’ या शब्दाला कधी-कधी नकारात्मक, अवहेलना करणारी छटा लाभली आहे. ‘काय त्या बायांच्या गोष्टी’, ‘बाई माणूस’ अशा वाक्यांतून स्त्रीला भावनावश, कमकुवत किंवा गौण ठरवण्याची प्रवृत्ती दिसते. येथे ‘बाई’ हा शब्द केवळ लिंग दर्शवत नाही, तर सामाजिक पूर्वग्रह व्यक्त करतो. स्त्रीच्या विचारक्षमतेवर, निर्णयक्षम तेवर प्रश्नचिन्ह उभे करणारा सूर या वापरातून जाणवतो.

**सामाजिक रचना आणि स्त्रीची ओळख**

‘बाई’ या शब्दाचा वापर बहुतेक वेळा स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाऐवजी तिच्या नातेसंबंधांवर भर देतो. पुरुष ‘माणूस’ म्हणून ओळखला जातो, तर स्त्री ‘कोणाची तरी बाई’ म्हणून. ही भाषिक रचना समाजातील पितृसत्ताक विचारसरणीचे प्रतिबिंब आहे. स्त्रीला स्वतःच्या नावाने, स्वतःच्या ओळखीने संबोधण्याऐवजी तिला नात्यांच्या चौकटीत बंदिस्त केले जाते.

**साहित्य, लोकसंस्कृती आणि ‘बाई’**

मराठी लोकगीते, ओव्या, लावण्या यात ‘बाई’ हा शब्द भावनिकतेने, कधी वेदनेने, कधी बंडखोरीने भरलेला आढळतो. ‘बाई मी विकत घेतला शेला’ या सारख्या लोकगीतांतून स्त्रीचे सौंदर्य, तिची इच्छा आणि तिचे साधे स्वप्न व्यक्त होते. संतसाहित्य आणि लोकसाहित्य यात ‘बाई’ ही सहनशील, कष्टाळू, पण अंतर्मुख ताकद असलेली व्यक्ती म्हणून उभी राहते.

**आधुनिक काळातील पुनर्विचार**

आजच्या समतावादी, स्त्री-सशक्तीकरणाच्या चर्चेत ‘बाई’ या शब्दाचा वापर पुनर्विचाराच्या टप्प्यावर आहे. अनेक स्त्रिया स्वतःला ‘स्त्री’, ‘महिला’ किंवा थेट नावाने संबोधले जाणे अधिक सन्मानकारक मानतात. तरीही ‘बाई’ हा शब्द पूर्णतः नाकारला गेलेला नाही; कारण तो मराठी संस्कृतीच्या मुळाशी रुजलेला आहे. प्रश्न शब्दाचा नसून, तो वापरण्यामागील भावनेचा आणि दृष्टिकोनाचा आहे.

**ग्रामीण संस्कृतीतील ‘बाई’: बहिणीपणाचे नाते आणि माणुसकीची ओळख**

ग्रामीण महाराष्ट्रात ‘बाई’ हा शब्द केवळ स्त्रीवाचक किंवा पत्नीवाचक नाही; अनेक ठिकाणी तो ‘बहीण’ या अर्थाने अत्यंत आपुलकीने, सन्मानाने आणि सामाजिक जबाबदारीने वापरला जातो. या वापरामागे केवळ भाषिक सवय नसून एक खोलवर रुजलेली संस्कृती, नातेसंबंधांची शिस्त आणि माणुसकीचा व्यवहार दडलेला आहे.

**‘बाई’ म्हणजे बहीण: संबोधनाची परंपरा**

ग्रामीण भागात अनोळखी स्त्रीला ‘अगं बाई’, ‘बाईसाहेब’, ‘त्या बाई’ असे संबोधले जाते; पण त्यामागील भाव ‘परकी स्त्री’ असा नसतो, तर ‘आपल्या घरातील बहीण’ असा असतो. विशेषतः वयाने लहान स्त्रीसाठी ‘बाई’ हा शब्द बहिणीसमान सुरक्षिततेची भावना निर्माण करतो. त्यामुळे ग्रामीण समाजात स्त्रीशी बोलताना एक मर्यादा, संयम आणि आदर आपोआप येतो.

ही परंपरा ‘परस्त्री मातेसमान’ या मूल्याशी जोडलेली असली, तरी व्यवहारात ती ‘परस्त्री बहिणीसमान’ या अधिक जिव्हाळ्याच्या भावनेने व्यक्त होते. बहीण म्हणजे हक्काची, पण मर्यादेतली; जवळची, पण सुरक्षित अंतर राखणारी नाती. ‘बाई’ हा शब्द हीच मर्यादा जपतो.

**सामाजिक सुरक्षिततेचे अलिखित नियम**

ग्रामीण संस्कृतीत ‘ती आमची बाई आहे’ असे म्हणणे म्हणजे त्या स्त्रीची सामाजिक जबाबदारी स्वीकारणे. एखाद्या गावात एखाद्या स्त्रीला ‘आपली बाई’ मानले गेले की, तिच्याशी गैरवर्तन करणे म्हणजे संपूर्ण गावाशी वैर ओढवून घेणे. अशा वेळी ‘बाई’ हा शब्द संरक्षणाचे कवच बनतो. विहीर, नदी, शेत, आठवडा बाजार, यात्रा अशा सार्वजनिक ठिकाणी स्त्री सुरक्षितपणे वावरू शकते, कारण ती ‘कोणाची तरी बाई’ नसून ‘सगळ्यांची बहीण’ असते. या भावनेतूनच ग्रामीण समाजात अनेकदा पुरुष स्वतःहून स्त्रीला मदत करतो, वाट दाखवतो किंवा संकटात साथ देतो.

**लोकसंस्कृतीत ‘बाई’ आणि बहिणीचे रूप**



ग्रामीण लोकगीते, ओव्या, भारुडे यात ‘बाई’ हा शब्द अनेकदा बहिणीच्या रूपात येतो. ‘बाई गं, पाणी भरायला ये’, ‘बाई गं, जपून चाल’ अशा ओळीत हाक मारण्यामागे अधिकार नाही, तर आपुलकी आहे. येथे ‘बाई’ ही ना पत्नी आहे, ना प्रेयसी; ती आपल्या कुटुंबातील, आपल्या माणसांपैकी एक आहे.

सण-उत्सवांमध्ये, विशेषतः राखीपौर्णिमा, भाऊबीज, यात्रा-जत्रांमध्ये ‘बाई’ ही बहीण म्हणून मान-सन्मानाने सहभागी होते. भावाने बहिणीची जबाबदारी घेणे ही केवळ रक्ताच्या नात्यापुरती मर्यादित नसून सामाजिक नात्यांपर्यंत विस्तारलेली असते.

**भाषेतून व्यक्त होणारी नैतिकता**

ग्रामीण भाषाव्यवहारात ‘बाई’ हा शब्द स्त्रीकडे पाहण्याची नैतिक चौकट ठरवतो. ‘ती बाई आहे’ असे म्हटले की तिच्याशी वागण्याचे नियम ठरतात. हसण्या-बोलण्यात मर्यादा, दृष्टिक्षेपात संयम आणि वर्तनात आदर अपेक्षित असतो. त्यामुळे भाषा ही नैतिक शिस्त घडवणारे साधन ठरते.

शहरी भाषेत जिथे स्त्रीला थेट ‘ती मुलगी’, ‘ती बाई’ असे कधीकधी उपेक्षेने म्हटले जाते, तिथे ग्रामीण ‘बाई’ हा शब्द बहिणीचा भाव जपून स्त्रीला सुरक्षित स्थान देतो.

**बदलते काळ आणि टिकून असलेली मूल्ये**

आज ग्रामीण संस्कृतीही बदलते आहे. मोबाईल, शहरांचा प्रभाव, स्थलांतर यामुळे नातेसंबंधांची भाषा बदलत आहे. तरीही अनेक गावात आजही ‘बाई’ हा शब्द बहिणीच्या अर्थाने वापरला जातो. संकटात सापडलेल्या स्त्रीसाठी ‘ती आपली बाई आहे’ असे म्हणणे म्हणजे आजही नैतिक बांधिलकी स्वीकारणे होय.

**‘बाई’ म्हणजे शिक्षिका: ज्ञान, शिस्त आणि मातृत्वाची प्रतिमा** – मराठी ग्रामीण आणि निमशहरी समाजात ‘बाई’ हा शब्द अनेक अर्थांनी वापरला जातो; पण त्यातील एक अत्यंत सन्माननीय, भावनिक आणि संस्कारक्षम अर्थ म्हणजे ‘शिक्षिका’. शाळेतील शिक्षिकेला ‘बाई’ म्हणण्यामागे केवळ संबोधन नाही, तर एक सांस्कृतिक स्वीकार, नैतिक विश्वास आणि ज्ञानप्रदानाच्या भूमिकेचा आदर दडलेला आहे.

**संबोधनातून उमटणारा सन्मान** – ग्रामीण शाळांमध्ये ‘टीचर’, ‘मॅडम’ पेक्षा ‘बाई’ हे संबोधन अधिक जिव्हाळ्याचे मानले जाते. विद्यार्थी ‘मास्तर’ आणि ‘बाई’ असे विभाजन करतात, पण दोन्ही शब्दांत समान सन्मान असतो. ‘बाई’ म्हणताना विद्यार्थ्यांच्या मनात भीतीपेक्षा विश्वास आणि अधिकारापेक्षा आपुलकी अधिक असते.

‘बाई येतायत’, ‘बाईनी सांगितलं आहे’ अशी वाक्ये शाळेतील शिस्तीची, पण प्रेमळ शिस्तीची जाणीव करून देतात. येथे ‘बाई’ म्हणजे केवळ शिकवणारी व्यक्ती नाही, तर मार्गदर्शन करणारी, चूक सुधारून घेणारी आणि योग्य वळण लावणारी व्यक्ती असते.

**शिक्षिका आणि मातृरूप** – मराठी समाजात शिक्षिकेला अनेकदा ‘दुसरी आई’ मानले जाते. ‘बाई’ या शब्दातच मातृत्वाची छटा दडलेली आहे. ज्या पद्धतीने आई मुलाला शिकवत नाही, पण संस्कार देते; त्याच पद्धतीने ‘बाई’ शिकवतानाच माणूस घडवते. त्यामुळेच शिक्षिकेच्या रागातही काळजी असते आणि तिच्या शिस्तीतही माया असते.

ग्रामीण शाळांमध्ये शिक्षिका विद्यार्थ्यांच्या घरची परिस्थिती जाणून असते; कोण शेतात काम करतो, कोण मजुरीला जातो, कोण उपाशी शाळेत येतो. अशा वेळी ‘बाई’ ही केवळ अभ्यास घेणारी नसून, जीवन समजून घेणारी मार्गदर्शक ठरते.

**भाषिक संस्कार आणि सामाजिक विश्वास**

‘बाई’ या शब्दाचा शिक्षिकेसाठी वापर होणे हे भाषिक संस्कारांचे द्योतक आहे. शिक्षक-शिक्षिका या नात्यातील मर्यादा, आदर आणि विश्वास हा शब्द आपोआप प्रस्थापित करतो. विद्यार्थ्यांसाठी ‘बाई’ म्हणजे अशी व्यक्ती जिच्याशी मोकळेपणाने बोलता येते, पण मर्यादा ओलांडता येत नाहीत. ग्रामीण समाजात पालकही ‘बाईवर विश्वास’ ठेवतात. ‘बाईना सगळं कळतं’, ‘बाई सांगतील तसं करा’ अशा वाक्यांतून शिक्षिकेच्या निर्णयक्षम तेवरचा विश्वास दिसतो. त्यामुळे ‘बाई’ हा शब्द सामाजिक विश्वासाचे प्रतीक ठरतो.

**स्त्रीशिक्षण आणि आदर्श प्रतिमा**

‘बाई’ ही ग्रामीण भागात अनेक मुलींसाठी पहिली आदर्श स्त्री असते. घराबाहेर काम करणारी, शिक्षित, आत्मविश्वासपूर्ण स्त्री म्हणून शिक्षिका मुलींच्या मनात वेगळे स्थान निर्माण करते. ‘आपणही मोठे होऊन बाई व्हायचं’ असे स्वप्न अनेक पिढ्यांनी पाहिले आहे.

या अर्थाने ‘बाई’ म्हणजे शिक्षणाच्या माध्यमातून स्त्री-सशक्तीकरणाचे जिवंत रूप. ती केवळ धडे शिकवत नाही, तर स्वतःच्या अस्तित्वातून स्त्रीच्या क्षमतेचे दर्शन घडवते.

**बदलते संबोधन, टिकून असलेला अर्थ**

आज ‘मॅडम’ हा शब्द रूढ होत असला तरी अनेक शाळांमध्ये ‘बाई’ हे संबोधन टिकून आहे. कारण ‘मॅडम’ मध्ये औपचारिकता आहे, तर ‘बाई’ मध्ये आपुलकी, संस्कार आणि स्थानिक संस्कृतीची उब आहे. काळ बदलला तरी ‘बाई’ या शब्दात दडलेला शिक्षिकेचा सन्मान अजूनही समाजमनात खऱ्या अर्थाने जिवंत आहे.

**पवित्र बायबलमधील ‘बाई’: स्त्री, बहीण, माता आणि विश्वासाची साक्षी** मराठी दैनंदिन भाषेत ‘बाई’ हा शब्द जसा अनेक अर्थांनी वापरला जातो, तसाच त्याचा भावार्थ पवित्र बायबलमधील स्त्रीसंबंधी संदर्भांशी जोडता येतो. जरी बायबलमध्ये थेट ‘बाई’ हा शब्द आधुनिक मराठी अर्थाने वारंवार येत नसला, तरी मराठी बायबलमध्ये ‘स्त्री’, ‘बाई’, ‘ती’, ‘माता’, ‘बहीण’ अशा शब्दांमधून स्त्रीचे जे विविध रूप उभे राहते, त्यातून ‘बाई’ या संकल्पनेचा आध्यात्मिक आणि नैतिक अर्थ स्पष्ट होतो.

**निर्मितीतील ‘बाई’: जीवनाची सहचर**

उत्पत्ती ग्रंथात (उत्पत्ती G$enesis २:१८-२४) देव म्हणतो, ''मनुष्य एकटा असणे चांगले नाही; त्याच्यासाठी त्याला साजेशी साहाय्यक बनवीन.''

येथे स्त्री ही केवळ पुरुषाची अनुयायी नाही, तर सहचर (hel{er suitable) आहे. मराठी संदर्भात पाहिले तर हीच स्त्री म्हणजे ‘बाई’ जी जीवनात साथ देणारी, समतोल राखणारी आणि सहअस्तित्व निर्माण करणारी आहे. येथे ‘बाई’ म्हणजे दुर्बल नव्हे, तर जीवनरचनेतील अपरिहार्य घटक आहे.

**‘बाई’ म्हणजे माता: आशीर्वादाचे पात्र**

पवित्र बायबलमध्ये स्त्रीचे सर्वात गौरवशाली रूप म्हणजे माता. हव्वा (Eve) हिला 'सर्व जिवंतांची माता' (उत्पत्ती Genesis 3:20) असे संबोधले जाते. पुढे सारा, रिबेका, राहेल, हन्ना या स्त्रिया मातृत्वाच्या वेदना, प्रार्थना आणि आशेचे प्रतीक बनतात. मराठी सांस्कृतिक अर्थाने ‘बाई’ म्हणजे आई – कष्ट, सहनशीलता आणि विश्वास यांचे मूर्त रूप. हन्नाची प्रार्थना १) हे दाखवते की ‘बाई’ म्हणजे देवाशी थेट संवाद साधणारी श्रद्धेची व्यक्ती.

**‘बाई’ म्हणजे बहीण: नैतिक नात्याची सीमा** – पवित्र बायबलमध्ये स्त्रीला ‘बहीण’ म्हणून संबोधण्याची परंपरा दिसते. नवीन करारात पौल प्रेषित म्हणतो की मंडळीतील स्त्रियांशी 'सर्व पवित्रतेने बहिणींसारखे वागा' (१ तीमथ्य ढळोंहू ५:२). येथे ‘बाई’ म्हणजे बहीण – जिच्याशी वागणुकीत संयम, आदर आणि नैतिक मर्यादा अपेक्षित आहेत. हा विचार ग्रामीण मराठी संस्कृतीतील ‘बाई म्हणजे बहीण’ या संकल्पनेशी आश्चर्यकारकपणे आणि अगदी तंतोतंत जुळतो.

**प्रभू येशू ख्रिस्त आणि ‘बाई’:** सन्मानाची पुनर्स्थापना. प्रभू येशू ख्रिस्ताने स्त्रियांना दिलेला सन्मान हा त्या काळातील समाजरचनेला छेद देणारा होता. शमरोनी स्त्री (योहान गेहप ४), व्यभिचारात पकडलेली स्त्री (योहान गेहप ८), मार्था आणि मारिया (लूक डींज्ञश १०) – या सर्व स्त्रियांशी प्रभू येशूने संवाद साधला, त्यांचे प्रश्न ऐकले आणि त्यांना आत्मिक मूल्य दिले. मराठी भाषांतरात येशू अनेकदा 'बाई' किंवा 'स्त्री' असे संबोधन वापरतो; पण त्या शब्दामागे तुच्छता नसून करुणा आणि प्रतिष्ठा आहे. येथे ‘बाई’ म्हणजे पापी म्हणून नाकारलेली नव्हे, तर देवाच्या कृपेची पात्र ठरलेली व्यक्ती आहे.

**‘बाई’ म्हणजे साक्षीदार: पुनरुत्थानाची पहिली वार्ता–**

येशूच्या पुनरुत्थानाची पहिली साक्ष स्त्रियांना मिळते (मत्तय Matthew २८, योहान John २०). मारिया मग्दलीन ही पुनरुत्थानाची पहिली साक्षीदार ठरते.

या संदर्भात ‘बाई’ म्हणजे देवाच्या महान कार्याची वाहक. ज्या समाजात स्त्रीची साक्ष मान्य नव्हती, तिथे देवाने स्त्रीलाच पहिले स्थान दिले – हा बायबलचा क्रांतिकारी संदेश आहे.

**मंडळीतील ‘बाई’: सेवा आणि समर्पण**

नवीन करारात फोएबे, प्रिस्किल्ला, लुदिया अशा स्त्रिया मंडळीतील सेविकेच्या भूमिकेत दिसतात (रोमकरांस पत्र ठोरपी १६). त्या केवळ सहाय्यक नसून, विश्वासाची, नेतृत्वाची आणि सेवाभावाची उदाहरणे आहेत. येथे ‘बाई’ म्हणजे देवाच्या कार्यात सहभागी होणारी विश्वासू सेविका – जी आध्यात्मिकदृष्ट्या सक्षम आहे.

**निष्कर्ष**

पवित्र बायबलमधील ‘बाई’ ही केवळ स्त्रीलिंगी व्यक्ती नाही; ती सहचर आहे, माता आहे, बहीण आहे, साक्षीदार आहे आणि देवाच्या योजनेतील सक्रिय सहभागी आहे. मराठी भाषेतील ‘बाई’ या शब्दाला कधी दुय्यम अर्थछटा चिकटवली जाते; पण बायबलचा संदेश याच्या अगदी उलट आहे आणि तो म्हणजे ‘बाई’ म्हणजे आदर, विश्वास आणि कृपेचे पात्र. म्हणूनच पवित्र बायबलच्या प्रकाशात पाहिले तर ‘बाई’ हा शब्द कमीपणाचा नव्हे, तर खऱ्या अर्थाने दैवी प्रतिष्ठेचा द्योतक ठरतो. ‘बाई’ म्हणजे शिक्षिका हा अर्थ केवळ भाषिक नाही, तर सांस्कृतिक आहे. ज्ञान, शिस्त, माया, मातृत्व आणि सामाजिक विश्वास या सगळ्यांचे संमिश्र रूप म्हणजे ‘बाई’. शिक्षिका म्हणून ‘बाई’ ही पिढ्या घडवणारी शक्ती आहे. त्यामुळे ‘बाई’ हा शब्द उच्चारताना मराठी समाज नकळत शिक्षणालाच वंदन करतो, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. ‘बाई’ हा शब्द एका बाजूला मातृत्व, कष्ट, आपुलकी आणि परंपरेचे प्रतीक आहे; तर दुर्सया बाजूला तो स्त्रीच्या दुय्यम स्थानाचे आणि सामाजिक पूर्वग्रहांचेही द्योतक ठरतो. म्हणूनच ‘बाई’ या शब्दाचा अर्थ स्थिर नाही, तो संदर्भानुसार बदलतो. आदराने वापरला तर तो सन्मानाचा ठरतो; अवहेलनेने वापरला तर तो अन्यायाचा ठरतो. भाषेतील अशा शब्दांकडे केवळ शब्द म्हणून नव्हे, तर समाजमनाचे प्रतिबिंब म्हणून पाहणे आवश्यक आहे. तेव्हाच ‘बाई’ या शब्दाचा यथोचित आणि न्याय्य अर्थ आपल्या लक्षात येतो. ग्रामीण संस्कृतीतील ‘बाई’ म्हणजे केवळ स्त्री नव्हे; ती बहीण आहे, जबाबदारी आहे, सुरक्षिततेचे नाते आहे. या शब्दातून ग्रामीण समाजाची सामूहिक नैतिकता, नातेसंबंधांची शिस्त आणि माणुसकीची जाण प्रकट होते. आधुनिक काळात शब्दांचे अर्थ बदलत असले तरी ‘बाई’ या शब्दात दडलेले बहीणपण जपले गेले, तर तो शब्द केवळ भाषिक नव्हे, तर सामाजिक संस्कार घडवणारा ठरेल.

**– डॉ. सुनील दादा पाटील,**
९९७५८७३५६९, ८४८४९८६०६४
(लेखक डॉ. सुनील दादा पाटील हे इतिहास, शिक्षण, साहित्य आणि पर्यावरणाचे अभ्यासक आहेत.)

# धर्मेंद्र यांच्या अखेरच्या सिनेमाला प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद ; पहिल्याच दिवशी तगडी कमाई

**प्रेक्षकवर्ग** हा आतुरतेने हा चित्रपट प्रदर्शित होण्याची वाट पाहत होता.कारण या चित्रपमध्ये सगळ्यांचे आवडते कलाकार धर्मेंद्र हे आहेत.धर्मेंद्र यांचा शेवटचा चित्रपट ‘इक्किस‘ हा १ जानेवारी रोजी, म्हणजे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाला खूप सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.त्यामुळे ‘इक्किस‘ने पहिल्या दिवशी चांगली कमाई केली.गेल्या २८ दिवसांपासून ‘धुरंधर‘ आणि ‘अवतार: फायर अँड अॅशेस‘ चे बॉक्स ऑफिसवर वर्चस्व होते.याशिवाय इतर चित्रपट देखील स्वतःला बॉक्स ऑफिसववर टिकवून



ठेवण्यासाठी संघर्ष करत आहेत.परिणामी, ‘इक्किस ‘ चा पहिल्या दिवशीचा परफॉर्मन्स चांगला होता. इक्किस हा चित्रपट सेकंड लेफ्टनंट अरुण खेत्रपाल यांच्या जीवनावर आधारित आहे.अगस्त्य नंदाने १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात वयाच्या २१ व्या वर्षी शहीद झालेल्या अरुण खेत्रपाल यांचे पात्र साकारले आहे.त्यांना मरणोत्तर परमवीर चक्र, देशाचा सर्वोच्च लष्करी सन्मान, प्रदान करण्यात आला, ज्यामुळे ते हा सन्मान मिळवणारे सर्वात तरुण सैनिक ठरले.

इक्किसची घोषणा – झाल्यापासूनच हा सिनेमा चर्चेत होता.कारण यावेळी सर्वांच्या नजरा अगस्त्य नंदावर होत्या. दरम्यान,ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले,ज्यामुळे हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला,जो पाहण्यासाठी लोक उत्सुक होते.हा चित्रपट श्रीराम राघवन यांनी दिग्दर्शित केला आहे.इक्किस पाहिल्यानंतर लोक भावुक झाले आणि सोशल मीडियावर त्यांच्या प्रतिक्रिया शेअर करू लागले.इक्किस मध्ये जयदीप अहलावत देखील आहेत,तो पाकिस्तानी सैन्याचे ब्रिगेडियर ख्वाजा मोहम्मद नसीर यांची भूमिका करताना दिसतोय. त्यांनीच युद्धादरम्यान अरुण खेत्रपाल यांना शहीद केले होते. त्यानंतर ते लाहोरमध्ये अरुणच्या वडिलांना भेटले आणि त्यांच्या शौर्याला सलाम केला. त्यांनी अरुणच्या वडिलांना असेही सांगितले की त्यांनी त्यांच्या मुलाला मारले होते, परंतु त्यांच्या मुलामुळे पाकिस्तान युद्धात हरला. धर्मेंद्र यांनी इक्किसमध्ये अरुणच्या वडिलांची भूमिका साकारली आहे.

## इक्किस ’चे पहिल्या दिवसाचे कलेक्शन

इक्किस ने पहिल्या दिवशी ७ कोटींची कमाई केली. अगस्त्य नंदाने या चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर पदार्पण केले असल्याने हा एक चांगला आकडा मानला जातो.दरम्यान, कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे यांच्या ’तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी’ने रिलीजच्या पहिल्या दिवशी ७.७५ कोटींची कमाई केली.येत्या काळात इक्किस किती कमाई करेल हे पाहणे मनोरंजक ठरेल.ऑक्युपन्सीच्या बाबतीत, पहिल्या दिवशी हिंदीमध्ये त्याने एकूण ३१.९४ % कमाई केली. इक्किसचे बजेट अंदाजे ४०-६० कोटी रुपये आहे.

# प्रार्थना : एक अमोघ शक्ती

**अमेरिकेतील** काही हॉस्पिटलांमध्ये गेल्या काही वर्षांपासून एक मोठा अजब प्रयोग सुरु आहे! तेथे रोग्यांना लवकर आराम मिळावा म्हणून औषधोपचारांच्याच जोडीला सामूहिक प्रार्थनाही केल्या जातात आणि आश्चर्य म्हणजे हे प्रयोग कमालीचे यशस्वी होत असल्याचा निर्वाळा तेथील अनेक प्रसिद्ध डॉक्टरांनी दिला आहे.

प्रार्थनेमध्ये खरोखरच इतके दिव्य सामर्थ्य आहे का? प्रार्थनेमुळे असाध्य गोष्टी साध्य होऊ शकतात का?

ॲलेक्सिस कॅरिलसारखे शास्त्रज्ञ प्रार्थनेची महती मुक्त कंठाने गातात. प्रार्थनेच्या प्रचंड प्रभावाने आपले जीवन उजळून टाकणा-या महान व्यक्तींत महात्मा गांधी, पंडित मदनमोहन मालवीय, ॲप्टन सिंक्लेअर इत्यादींची उदाहरणे प्रसिद्ध आहेत. प्रार्थना हा त्यांचे जीवन उजळवून टाकणारा जणू परीस ठरला! ही उदाहरणे डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येक मनुष्याने स्वतः च्या, तसेच जगाच्या कल्याणासाठी रोज थोडा वेळ का होईना परमेश्वर प्रार्थना केली पाहिजे. ती करण्याची वेळ ठराविक असावी. इतकेच नव्हे तर ती अंतः करणापासून केली पाहिजे.

'आठ पाहारा माझारी ख
मोटके निमिष भरी देतु जाय खख'

असे भगवंतांनी गीतेच्या बाराव्या अध्यायात म्हटलेच आहे. प्रार्थनेमुळे खरोखरच अनेक चमत्कार घडू शकतात. या संदर्भात नुकतीच वाचलेली एक सत्यकथा प्रथम वाचकांपुढे ठेवतो-

संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक आणि सुप्रसिद्ध लेखक कै.ह.भ.प.ल.रा. पांगारकर यांनी 'चरित्रचंद्र' या नावाचे एक मोठे सुंदर आत्मवृत्त लिहिले आहे. हे पुस्तक अतिशय मनोरंजक व वाचनीय आहे.

प्रस्तुत पुस्तकात कै. पांगारकरांनी आपल्या आयुष्यातील कितीतरी विलक्षण प्रसंग प्रसन्न, रसाळ भाषेत कथन केले आहेत.

पृष्ठ सतरावर असाच एक विलक्षण प्रसंग वाचावयास मिळतो. तो प्रसंग पांगारकरांच्याच भाषेत वाचण्यात मौज आहे.

पांगारकर लिहितात-

'.......मला आठवे वर्ष लागताच आकडी (फिफ्ट्स) येऊ लागली! उभ्या उभ्या कोठे तरी पडावे, लागावे, खरचटावे, तोंडाला फफेस यावा, बेशुद्ध व्हावे असे प्रकार सुरु झाले. घरातील मंडळी घाबरली. गावठी उपाय झाले. नवससायास झाले. घरातील मंडळींच्या वाटाघाटीत व दुःखशोकात भाऊ सामील झाले नाहीत. त्यांच्या नित्यक्रमात रतीभर फफरक पडला नाही. 'पोर वाया चाललं, देव देव करीत बसतात, पोराकडे लक्ष देत नाहीत, पुण्यात बापू मेहेंदळे नामांकित वैद्य आहेत, त्यांना तरी दाखवावे.' अशी घरात कुरबूर झाली. दादा व बापू आठ महिन्यांच्या अंतराने वारले. दादांचे मजवर अतिशय प्रेम होते, मला त्यांचा लळा होता. बाप जन्मतःच खाऊन टाकला म्हणून जननी माझा राग राग करी; मला बडवी, मारी. म्या तिच्या भयाने दादांच्या मागे जाऊन लपावे, दादांनी म्हणावे, 'राधाबाई, खबरदार बाळाला माराल तर! तुमच्या धाकाने पोर वाळेल!'

एकदा एका दिवसात तीन वेळा जोरदार आकड्या आल्या. आईताईच्या तोंडचे पाणी पळाले. आई भाऊंवर खूप रागावली, त्यांना वाकडेतिकडे बोलली. भाऊंनी मनात काही योजना केली. त्यांनी शेत्या (शेतीचे काम करणारा) यास रात्री दहा वाजता दारापुढे गाडी घेऊन हजर राहण्यास सांगितले. भाऊंनी पहाटे दोन वाजता उठून स्नानसंध्या , पूजा केली व चारपाच वाजता मला गाडीत घालून पुण्याच्या वाटेला लावले. सर्वांना वाटले, की हे बाळाला घेऊन पुण्यास बापू मेहेंदळ्यांना दाखवायला चालले आहेत.

गाडी मैलभर गेल्यावर तेथून दुसरा रस्ता आळंदीकडे फफुटतो. त्या रस्त्याने गाडी नेण्यास भाऊंनी गाडीवानास सांगितले.

भाऊंची ज्ञानेश्वर महाराजांवर अत्यंत श्रद्धा. पंढरपूर व आळंदी या शिवाय ते बहुधा कोठे गेले नाहीत. एकदा फफक्त गिरीला गेले होते. गाडी आळंदीस येताच नेहमीच्या क्षेत्रोपाध्यायांकडे आम्ही उतरलो. नैवेद्य, ब्राम्हण, सुवासिनी सांगितल्यावर भाऊंनी मला इंद्रायणीवर नेले. तेथे दोघांची स्नाने झाली. आम्ही ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिरात गेलो. भाऊंनी पंचामृताचा पादुकांवर अभिषेक करून पूजा केली. मी त्यांच्यासमोर पादुकांच्या दुर्सया बाजूला बसलो होतो. मला त्यांनी फफुले, तुळशी वाहण्यास सांगितले व माझे डोके आपल्या दोन्ही हातांनी धरून पादुकांवर ठेवले व सद्‌गदित अंतःकरणाने श्रीज्ञानेश्वर महाराजांनी पुढील अर्थाची प्रार्थना केली,

'देवा! तुझा बाळ, तू यास सांभाळ,
याची न आबाळ काही करी ख
संसार जंजाळ वारी कृपाजाळ ख
दारी करी काळ हा चाकरी खख
दावी न वैद्यामस धन्वंतरी यास ख
तू एक विश्वास, हा अंतरी ख
बा ! वाचवी यास त्वत्कीर्ती गायास ख
लावी खरी आस माझी हरी खख

'तुझ्यावाचून मी दुसरा वैद्य जाणत नाही व तुझ्या चरणतीर्थावाचून मी याला दुसरे औषध देणार नाही,' असे म्हणून भाऊंनी माझ्या तोंडात तीर्थ घातले. आणि..........

'ज्ञानेशे सदये स्वभक्तीकृतही
सत्प्रार्थना ऐकली
देहाची मम दुर्दशा पुनरपी
नाही कधी जाहली खख
भक्ते प्रेमरसे सद्‌गद्‌रवे
देवासि लाभाइले खख
देवे त्यासि उपेक्षिले न कधिही
ऐसे कुणी ऐकिले खख

श्री. पांगारकर शेवटी लिहितात,

'त्या क्षणापासून ह्या क्षणापर्यंत मला कधीही आकडी आली नाही.'

कै. पांगारकरांच्या ह्या उदाहरणावरून जगातील कित्येक अशक्य गोष्टी केवळ मनोभावे केलेल्या ईश्वराच्या प्रार्थनेमुळे शक्य होऊ शकतात असे दिसते. श्री सद्गुरू शरणमब मम तव कृपाही केवलमब राधे राधे राधेश्याम एकही राधा एकही श्याम.

# जैविक विविधता : मानवी भवितव्याचा अनिवार्य आधार

**आंतरराष्ट्रीय** जैविक विविधता दिन २९ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला. हा केवळ पर्यावरणीय जाणीव जागविणारा औपचारिक दिवस नसून तो मानवी समाजाच्या अस्तित्वाशी, संस्कृतीशी आणि शाश्वत भविष्यासोबत अतूटपणे जोडलेला आहे. जैविक विविधता म्हणजे पृथ्वीवरील सर्व सजीवसृष्टीतील वैविध्य, वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव, त्यांच्या प्रजाती, जनुकीय वैशिष्ट्ये आणि त्यांना आधार देणाऱ्या परिसंस्था होय. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता जैविक विविधता ही केवळ निसर्गशास्त्रीय संकल्पना नसून मानवी समाजरचना, आर्थिक व्यवहार, सांस्कृतिक मूल्ये आणि राजकीय निर्णय यांचा आरसा आहे. समाज निसर्गाशी जसा वागतो, तशीच त्याची विचारसरणी, सत्तासंबंध आणि विकासाची दिशा स्पष्ट होत जाते.

मानवी इतिहासाच्या सुरुवातीपासूनच निसर्ग आणि समाज यांचे नाते परस्परावलंबी राहिले आहे. आदिम समाजात मानव पूर्णतः निसर्गावर अवलंबून होता. अन्न, पाणी, निवारा, औषधे आणि संरक्षण यासाठी जैविक विविधता हाच त्याचा आधार होता. त्यामुळे जंगल, नदी, पर्वत, वृक्ष आणि प्राणी यांना पवित्र मानण्याची परंपरा विकसित झाली. या श्रद्धांमागे अंधविश्वास नव्हे, तर निसर्गसंवर्धनाची सामूहिक सामाजिक जाणीव होती. भारतीय समाजातील लोकसंस्कृती, सण-उत्सव, व्रते, परंपरा आणि लोककथा या निसर्गाशी घट्ट जोडलेल्या आहेत. वड, पिंपळ, तुळस, नाग, गाय यांना दिलेले पावित्र्य हे जैविक विविधतेचे संरक्षण करणारे सामाजिक-सांस्कृतिक साधन होते. समाजाने निसर्गाशी संघर्ष न करता सहजीवनाचा मार्ग स्वीकारला होता. कृषी संस्कृतीच्या उदयानंतर जैविक विविधतेचे सामाजिक महत्त्व अधिक दृढ झाले. पिकांची विविधता, स्थानिक बियाणे, मातीची सुपीकता, पावसाचे चक्र आणि हवामान यावर समाजाची अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य अवलंबून होते. प्रत्येक प्रदेशाने आपल्या भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांनुसार शेतीपद्धती विकसित केल्या. विविध पिके, स्थानिक जाती आणि पारंपरिक शेतीपद्धती यामुळे समाज संकटांना तोंड देऊ शकत होता. समाजशास्त्र सांगते की विविधता ही केवळ परिसंस्थेची नव्हे, तर समाजाच्या टिकावाची मूलभूत अट आहे. एकसुरीपणा निसर्गात जितका धोकादायक आहे, तितकाच तो समाजासाठीही घातक ठरतो.

मात्र औद्योगिक क्रांतीनंतर निसर्ग आणि समाज यांचे नाते मूलभूतपणे बदलले. उत्पादनक्षमता, औद्योगिकीकरण, बाजारव्यवस्था, नफा आणि उपभोग या संकल्पनांनी विकासाची व्याख्या ठरवली. जंगलतोड, खाणउद्योग, मोठे धरण प्रकल्प, रासायनिक शेती, औद्योगिक प्रदूषण आणि अनियंत्रित शहरीकरण यामुळे जैविक विविधतेचा ऱ्हास झपाट्याने होऊ लागला. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता हा ऱ्हास केवळ पर्यावरणीय प्रश्न नसून सामाजिक विषमतेचा परिणाम आहे. विकासाच्या नावाखाली काही मोजके घटक समृद्ध झाले, तर त्याची किंमत गरीब, ग्रामीण, आदिवासी आणि वंचित समाजांना मोजावी लागली. जैविक विविधतेचा ऱ्हास म्हणजे केवळ प्रजातींचा नाश नव्हे, तर उपजीविकेचा ऱ्हास, सांस्कृतिक विस्थापन आणि सामाजिक असुरक्षिततेची प्रक्रिया आहे.

आदिवासी समाज आणि जैविक विविधता यांचे नाते विशेष उल्लेखनीय आहे. जंगल हे आदिवासींसाठी केवळ संसाधन नसून त्यांचे घर, उपजीविकेचे साधन, सामाजिक ओळख आणि आध्यात्मिक विश्व आहे. अन्नसंकलन, पारंपरिक शेती, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लोककथा, गीतं आणि धार्मिक श्रद्धा या सर्वांचा आधार जैविक विविधतेवर आहे. त्यामुळे अनेक अभ्यासक आदिवासी समाजाला जैविक विविधतेचा नैसर्गिक संरक्षक मानतात. परंतु आधुनिक विकासाच्या नावाखाली या समाजांना विस्थापन, दारिद्र्य आणि सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागला. जंगलांचे राष्ट्रीयीकरण, औद्योगिक प्रकल्प, खाणकाम आणि वन्यजीव अभयारण्यांच्या धोरणांमुळे त्यांच्या पारंपरिक हक्कांवर गदा आली. समाजशास्त्र या प्रक्रियेला 'विकासाच्या नावाखाली होणारा सामाजिक अन्याय' असे संबोधते. जैविक विविधता आणि मानवी उपजीविका यांचे नाते अतिशय घट्ट आहे. जगातील कोट्यवधी लोक अन्न, औषधे, इंधन, चारा, मासेमारी आणि रोजगारासाठी थेट निसर्गावर अवलंबून आहेत. पारंपरिक औषधपद्धती, लोकवैद्यक आणि आयुर्वेद हे जैविक विविधतेच्या ज्ञानावर उभे आहेत. मात्र आधुनिक औद्योगिक व्यवस्था, पेटंट कायदे आणि व्यापारी हितसंबंधांमुळे या पारंपरिक ज्ञानाला दुय्यम स्थान देण्यात आले. परिणामी अनेक वनस्पती प्रजाती नष्ट होत आहेत आणि त्याचबरोबर पिढ्यानपिढ्या चालत आलेले लोकज्ञानही लुप्त होत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही केवळ पर्यावरणीय हानी नसून सांस्कृतिक दारिद्र्याची प्रक्रिया आहे.

शहरी समाज अनेकदा स्वतःला निसर्गापासून वेगळे समजतो, परंतु प्रत्यक्षात शहरांचे अस्तित्वही जैविक विविधतेवरच अवलंबून आहे. पाणी, अन्न, हवा आणि ऊर्जा यासाठी शहरे ग्रामीण भाग आणि नैसर्गिक परिसंस्थांवर विसंबून असतात. तरीही शहरीकरणामुळे हिरवळी नष्ट होतात, नद्या प्रदूषित होतात, ओढे बुजवले जातात आणि स्थानिक प्रजाती लुप्त होतात. वाढते तापमान, पूर, दुष्काळ, प्रदूषणजन्य आजार आणि मानसिक तणाव हे त्याचे थेट परिणाम आहेत. समाजशास्त्र सांगते की निसर्गापासून तुटलेपण ही आधुनिक समाजाची गंभीर समस्या आहे आणि ती सामाजिक तणाव, विषमता व असुरक्षितता वाढवते. जागतिक पातळीवर जैविक विविधतेचे राजकारणही तितकेच महत्त्वाचे आहे. जैविक संसाधनांवर कोणाचा हक्क, त्यातून होणाऱ्या नफ्याचे वाटप आणि संरक्षणाची जबाबदारी हे प्रश्न सत्तासंबंधांशी जोडलेले आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्या जैविक संसाधनांचे व्यापारीकरण करतात, तर स्थानिक समुदायांना त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. 'जैव-चोरी' ही संकल्पना याच अन्यायातून उदयास आली आहे. समाजशास्त्रीय विश्लेषण जागतिक असमानता, उत्तर-दक्षिण दरी आणि पर्यावरणीय शोषण यांचा परस्परसंबंध स्पष्ट करते. जैविक विविधतेच्या संरक्षणात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक समाजांमध्ये महिलाच बियाणे जतन करतात, पाणी व्यवस्थापन करतात, अन्नसंकलन आणि पारंपरिक औषधज्ञान जपतात. मात्र निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. पर्यावरणीय धोरणांमध्ये आणि स्थानिक व्यवस्थापनात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे म्हणजे केवळ जैविक विविधतेचे संरक्षण नव्हे, तर सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. समाजशास्त्र लिंगभाव आणि पर्यावरण यातील घनिष्ठ नाते अधोरेखित करते.

आज हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जैविक विविधतेचे महत्त्व अधिक ठळकपणे समोर आले आहे. विविध प्रजाती आणि परिसंस्था हवामान बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवतात. मात्र जैविक विविधतेचा ऱ्हास ही क्षमता कमी करतो आणि नैसर्गिक आपत्ती अधिक तीव्र होतात. त्याचा फटका सर्वाधिक गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांना बसतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही परिस्थिती 'पर्यावरणीय अन्याय' दर्शवते, जिथे संकटे सर्वांनी निर्माण केलेली असतात, पण त्याची किंमत काही मोजक्यांनाच मोजावी लागते.आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन साजरा करताना केवळ भाषणे, घोषणा किंवा औपचारिक कार्यक्रम पुरेसे नाहीत. विकासाची संकल्पना पुन्हा तपासण्याची गरज आहे. अमर्याद उपभोग, निसर्गाचे शोषण आणि तात्कालिक नफा याऐवजी शाश्वतता, समतोल, सामाजिक न्याय आणि नैतिक जबाबदारी या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्था, माध्यमे, संशोधन संस्था आणि सामाजिक चळवळी या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जैविक विविधतेविषयी संवेदनशीलता निर्माण करणे म्हणजे निसर्गाशी मानवी नात्याचे पुनर्निर्माण करणे होय.

समारोप करताना असे म्हणावे लागेल की जैविक विविधता ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असली तरी तिचे भविष्य मानवी समाजाच्या हातात आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोन आपल्याला हे शिकवतो की निसर्ग आणि समाज यांचे नाते केवळ उपयोगाचे नसून नैतिक जबाबदारीचे आहे. जर आपण आज जैविक विविधतेचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलो, तर त्याची किंमत येणाऱ्या पिढ्यांना मोजावी लागेल. म्हणूनच 'आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन' हा केवळ स्मरणदिन न राहता निसर्ग, समाज आणि मानवतेच्या शाश्वत भविष्याचा सामूहिक संकल्प करण्याचा दिवस ठरावा, हीच काळाची आणि समाजाची खरी गरज आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# धुंदुरमास.... एक छान मराठी प्रथा ! ( शास्त्रीय, शास्त्रोक्त व साहित्यिक आस्वाद )

आपल्या अनेक प्रथा, सण आणि त्या वेळचे आचरण व विधी यांच्या मागे शास्त्रीय कारणे असून ती सर्वांना समजणार नाहीत म्हणून त्याची सांगड धर्माशी घातलेली दिसते. त्यामुळे आरोग्य, धर्म, सामाजिक एकोपा, परंपरा हे सगळे एकाचवेळी सहजपणे पाळले जाते. धुंदुरमास ही अशीच एक छान परंपरा आहे. या संबंधीचे अनेक पैलू आपण पाहूया.

**१) धुंदुरमास या शब्दाची गंमतीदार उत्पत्ती –** धनु राशीत सूर्याने प्रवेश केला की त्या दिवसापासून ते मकर राशीत सूर्य प्रवेश करीपर्यंत म्हणजेच मकर संक्रांतीच्या भोगी या आदल्या दिवसापर्यंत, म्हणजे एक महिनाभर हा धुंदुरमास पाळला जातो. धनु राशीत सूर्यप्रवेश म्हणून खरेतर याचे नाव धनुर्मास आहे. या काळात पहाटेचा आहार घेणे महत्वाचे असते. मराठी भाषेत झुंजुमुंजू होणे म्हणजे पहाट होणे, उजाडणे आणि सूर्योदयाआधी दिशा उजळतात ती वेळ म्हणजे झुंजुमुंजू ! परंतु झुंझुरके म्हणजे त्याच्याही आधीची वेळ. काळोख तर आहेच पण उजेडही येऊ घातला आहे. त्यामुळे या संबंधातील नादमय शब्दांच्या मेळामुळे धनुर्मास म्हणण्याऐवजी धुंदुरमास, धुंधुरमास, झुंझुरमास असे म्हणतात. या महिन्याला असलेल्या धनुष्याच्या संदर्भामुळे चाप मास, कोदंड मास, कार्मुक मास, पंचांगात कुठेही उल्लेख नसल्याने शून्यमास अशी देखील नावे आहेत. दक्षिण भारतात कांही ठिकाणी हा उत्सव गोदा रंगनाथ कल्याण उत्सव म्हणून साजरा केला जातो.

**२) हिंदू वर्ष हे त्रिमूर्ती दत्ताशी जोडलेले –** आषाढ, श्रावण, भाद्रपद आणि अश्विन हे चार महिने ब्रह्मदेवाचे म्हणजेच निर्मितीचे ! याच काळात नवीन पिके, फळे, भाज्या, फुले, धान्य निर्माण होते. पक्षी, प्राणी यांची नवीन प्रजा निर्माण होते. या काळात विश्वाचे पोषणकर्ते भगवान विष्णू मात्र निद्रा घेत असतात. नंतरचे कार्तिक, मार्गशीर्ष, पौष आणि माघ हे भगवान विष्णूचे म्हणजे पालनपोषणाचे ! पालनकर्त्या विष्णूचे स्मरण व पूजा करून सृष्टीत निर्माण झालेल्या पदार्थांनी आपले पोषण करण्याचा हा महत्वाचा काळ आहे. म्हणून याच काळात धुंदुरमासाचे प्रयोजन अचूक आहे. फाल्गुन, चैत्र, वैशाख आणि ज्येष्ठ हे महिने भगवान शंकराचे ! प्रचंड उन्हाळा, जुने जाळून टाकणारी होळी, शेतांमधून जाळला जाणारा राब ( पालापाचोळा--गवत ), विविध ठिकाणी लागणारे वणवे ही सारी शिवाच्या तांडवाची रूपे ! नंतर घडणाऱ्या निर्मितीसाठी खूप आवश्यक असणारी !

**३) आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त काळ –** सकाळी लवकर उठणे, सुप्रभाती प्रज्वलित होणारा जठराग्नी, वाढलेली पचनशक्ती आणि निसर्गाने विविध निर्मितीतून पुरविलेले लाड ही या काळाची वैशिष्ट्ये ! उन्हाळा आणि पावसाळ्यापेक्षा या काळात अन्नपचन उत्तम होते. म्हणून शरीराला उत्तम आहाराचा दिलेला बूस्टर डोस पुढे पॉवर पॅकच ठरतो. अत्यंत पौष्टिक आणि उष्ण पदार्थांचा आहारात समावेश केला जातो.

**४) निसर्गाकडे गरीब श्रीमंत भेदभाव नाही –** अत्यंत महाग वस्तूंमध्ये जशी पोषणमूल्ये असतात तशीच स्वस्त मिळणाऱ्या पदार्थांमध्येही असतात. शेतात किंवा उघड्या जागी थंडीची मजा, शेकोटीची ऊब, कुटुंबातील सर्वांची सोबत हे सगळेच शरीराला आणि मनाला उभारी आणणारे असते. सर्व भाज्यांची एकत्रित लेकुरवाळी भाजी, भाकरी, वांग्याचे भरीत, लोणी, कांद्याची चटणी, मुगाची खिचडी हा आदर्श मेनू ! स्टार्टर्स म्हणून शेंगदाणे, गूळ, उसाचे करवे, रेवडी, कोवळे हरभरे असे पदार्थ तर पक्वान्न म्हणून तीळ लावलेली गुळाची पोळी व तूप आहेच. अधिक खमंग खायचे असेल तर गरमागरम पोपटी आहे. अगदी नगण्य वाटणाऱ्या पण अत्यंत दुर्मिळ खनिजे असलेल्या तिळाचे या काळात खूपच महत्व असते. हुरडा, हुरड्याचे थालीपीठ, खापरावरची पुरणपोळी हे पदार्थ सुद्धा लोकप्रिय आहेत. गुजराती पद्धतीचा उंधियु, उबाडीयू ,पोंक, अडदिया ( उडीद ) पाक, गुंदर ( डिंक ) पाक, सालेम ( कोहळा पाक ) पाक यांची रेलचेल असते. या सर्वांचा सूर्याला नैवेद्य अर्पण करून, भगवान विष्णूंचे स्मरण करून मग तो प्रसाद म्हणून खायचा.

**५) पहाटे भरपेट खाण्याची एकमेव पार्टी–** अपरात्री सुद्धा भरपेट खाण्यापिण्याच्या पार्ट्या आपण नेहमीच पाहतो. पण पहाटे भरपेट खाण्यापिण्याची, शास्त्रोक्त आणि शास्त्रीय आधार असलेली ही आपल्या संस्कृतीतील एकमेव पार्टी असावी. पूर्वी हा धुंदुरमास घरोघरी साजरा केला जाई. आता आवड आहे पण सवड नाही. मग हे सगळे अगदी साग्रसंगीत आयते मिळाले तर ? याच विचाराने मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथील 'आस्वाद ' उपाहार गृहामध्ये धुंदुरमास सोहळ्याचे जानेवारी २०२६ च्या चारही रविवारी खास आयोजन केले आहे. आपल्या स्वागतासाठी या उपाहार गृहाच्या दारात प्रत्यक्ष सनईवादन, रांगोळी आणि मराठी संस्कृतीचे लेणे असलेल्या गावाकडील शेताची व दिवाळीतील किल्ल्याची प्रतिकृती पाहायला मिळते. आत शिरल्यावर मंत्रघोषात गुरुजी ( भटजी ) आपल्याला तीर्थप्रसाद देतात. तसेच गंध, फुल, हळदीकुंकू, अत्तर लावून स्वागत केले जाते. लग्नकार्यातील वऱ्हाडींसारखे फेटे बांधलेले सेवक अगदी आपुलकीने आपल्याला मध घातलेले चविष्ट गरम लिंबूसरबत देतात. नंतर येतो तो खास धुंदुरमास विशेष पदार्थांचा नजराणा ! स्टार्टर्स म्हणून गूळ - शेंगदाणे, उसाचे करवे, रेवडी, बोरे, कोवळे हरभरे, कुरमुरे, कुरडई यांचे बाउल्स व त्याच्या बाजूला गरमागरम आंबोळी, ज्वारीबाजरीचे खमंग थालीपीठ आणि लोणी, लिंबू लोणचे, लसूण चटणी, तीळयुक्त साटोरी, मऊ भात - मेतकूट - साजूक तूप, खारकेची खीर ! तुम्ही खाण्याचा आस्वाद घेत असतांना, प्रत्यक्ष मंत्रपठण सुरूच असते. उपाहार गृहाचे मालक, मालकीणबाई यांच्यासह आस्वाद कुटुंब टीम, प्रत्येकाची विचारपूस करतात. धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेली एक वेगळी खाद्यानुभूती लाभल्याचे समाधान मिळते. येथे खूप गर्दी होत असल्याने पूर्व आरक्षण आवश्यक आहे. अशा या धुंदुरमासाच्या आणि आजपासून सुरु झालेल्या इंग्रजी नवीन वर्ष २०२६ च्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**- मकरंद करंदीकर.**
makarandsk@gmail.com

# राज्यपालांच्या हस्ते 'महाराष्ट्र लोकभवन' दिनदर्शिकेचे प्रकाशन



मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राजभवनाचे नाव 'लोकभवन' करण्यात आल्यानंतर प्रथमच तयार करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र लोकभवन' दिनदर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते लोकभवन, मुंबई येथे करण्यात आले.

यावेळी राज्यपाल देवव्रत यांनी दिनदर्शिकेच्या माध्यमातून इतिहास पुढे आणल्याबद्दल सर्व संबंधितांचे अभिनंदन केले. अनेक नामांकित छायाचित्रकारांनी वेळोवेळी काढलेल्या लोकभवनातील ऐतिहासिक वास्तूंच्या उत्कृष्ट छायाचित्रांचा दिनदर्शिकेमध्ये समावेश करण्यात आला आहे. मुंबई लोकभवनाशिवाय दिनदर्शिकेमध्ये नागपूर, पुणे व महाबळेश्वर येथील लोकभवनांच्या वास्तूंची देखील आणि मुंबई येथील लोकभवनामध्ये मुक्त संचार असलेल्या राष्ट्रीय पक्षी मोराच्या छायाचित्रांचा समावेश करण्यात आला आहे.

ऐतिहासिक वास्तूंच्या नव्या छायाचित्रांसोबतच संबंधित वास्तूंच्या जुन्या छायाचित्रांचा देखील दिनदर्शिकेमध्ये समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक छायाचित्राला ऐतिहासिक संदर्भ देण्यात आला आहे.

दिनदर्शिकेत सुधारक ओलवे, नवीन भानुशाली, सचिन वैद्य, प्रतिक चोरगे, हनीफ तडवी, संदीप यादव, वैभव नाडगावकर, रमण कुलकर्णी, नागोराव रोडेवाड, आकाश मनसुखानी, सतीश कुलकर्णी, चंद्रकांत खंडागळे यांच्या छायाचित्रांचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे उपसचिव राममूर्ती व जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर उपस्थित होते.

# हिंगोलीत राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ व्याख्यान मालेचे आयोजन

हिंगोली, दि. ३ (प्रतिनिधी) - राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीमाई फुले दशहरात्रोत्सवांतर्गत, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेड हिंगोली द्वारा मागील २६ वर्षापासून राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ व्याख्यान मालेचे आयोजन केले जाते. याही वर्षी ३,४ व ५ जानेवारी २०२६ ला भव्य स्वरूपात या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येणार असून यावर्षी व्याख्यानमालेचे २७ वे वर्ष असून त्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. ३ जानेवारी शनिवार रोजी व्याख्यान मालेचे पहिले पुष्प व्याख्यात्या राजश्रीताई पाटील ह्या महिलांची आर्थिक साक्षरता आणि सक्षमिकरण या विषयावर गुंफणार आहेत.

अकोला रोडवर असलेल्या हॉटेल शांतीच्या सभागृहात हि व्याख्यान माला होणार आहे. आतापर्यंत या व्याख्यानमालेत महाराष्ट्र व भारतातील नामवंत विचारवंत लेखक व यांनी आपले विचार मांडले आहेत, त्यामध्ये क्रांतीपुरुष पुरुषोत्तम खेडेकर, डॉ. आ.ह. साळुंखे, प्रा. जैमिनी कडू, इंजि. नेताजी गोरे इंजि. चंद्रशेखर शिखरे, प्रा. अशोक राणा, प्राचार्य विठ्ठल वाघ, रामकृष्ण दादा बेलूरकर, ज्ञानेश महाराज, ब्रिगेडियर सुधीर सावंत,श्रीमंत कोकाटे,गंगाधर बनबरे, स्मिताताई देशमुख, छायाताई महाले, सैल जेमिनी, डॉ. साहेब खंदारे, प्रा. यशवंत गोसावी, प्रा. प्रतिमा परदेशी, कॅप्टन भारती जाधव, प्रा. शाम मानव, ॲड. शंकरराव निकम, ज्ञानेश वाकुडकर, विश्वास उडगी, ॲड. गणेश हलकरे इत्यादी सह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली आहे. याही वर्षी विविध क्षेत्रातील दिग्गज व्याख्यान मालेस उपस्थित राहणार आहेत. सावित्रीमाई फुले जयंती निमित्त, ३ जानेवारी २०२६ ला व आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त, राजश्रीताई हेमंत पाटील (सामाजिक कार्यकर्त्या व अध्यक्ष गोदावरी ग्रुप) ह्या 'महिलांची आर्थिक साक्षरता आणि सक्षमीकरण' या विषयावर विचार मांडणार आहेत. ४ जानेवारीला, विजय गवळी, छत्रपती संभाजी नगर (जगद्गुरु तुकोबाराय अभंगाचे अभ्यासक, चित्रकार, विचारवंत) हे 'भूत, वर्तमान व भविष्यासाठीची शिदोरी- जगद्गुरु तुकोबाराय' या विषयावर प्रबोधन करणार आहेत. तर ५ जानेवारीला,सतीश सातोणकर,परभणी (मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अभ्यासक, लेखक) हे 'मराठवाडा मुक्ती संग्रामातील काही विशेष संदर्भ' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. असे दिग्गज यावर्षीही प्रबोधन करण्यास येणार आहेत. या प्रबोधन पर्वाचा लाभ घ्यावा असे आवाहन, खंडेराव सरनाईक, मनोज आखरे, शिवाजीराव पाटील, पंडित अवचार, पंडित शिरसाट, राजकुमार वायचाळ, डॉ. कोरडे परसराम हेंबाडे, हरिभाऊ मुटकुळे, माधव जाधव, सुधाकर मेटकर ,प्रियंका भोयर,साधना हेंबाडे, गोपाल भोस, विकास कल्याणकर,सुधाकर बल्लाळ, विश्वास वानखेडे, शिवाजी मेटकर, शिवराज सरनाईक, महेश राखुंडे, सुरेश मईग, प्रकाश ठाकरे आदी सह सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे.

**व्याख्यान मालेचे पहिले पुष्प –** हिंगोली येथील हॉटेल शांती होंडाच्या शोरुममध्ये सायंकाळी ७.३० वाजता व्याख्यान मालेचे पहिले पुष्प सामाजिक कार्यकर्त्या तथा अध्यक्षा, गोदावरी समुह राजश्री हेंमत पाटील ह्या महिलांची आर्थिक साक्षरता आणि सक्षमिकरण या विषयावर पहिले पुष्प गुंफले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्र. शिक्षणाधिकारी असावरी काळे तर उद्घाटीका सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रेमलता गोमासे (जगताप) ह्या असणार आहेत. तर प्रमुख पाहुणे कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी दिपीका कदम ह्या होत्या.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# निवडणुकीसाठी ईव्हीएम यंत्रणा पुरेशा प्रमाणात उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि अडथळारहित पार पाडण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) यंत्रणा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत. महानगरपालिका प्रशासनामार्फत कंट्रोल युनिट (सीयू) व बॅलेट युनिट (बीयू) यांची मागणी करण्यात आली होती. त्या मागणीनुसार पुरेशा प्रमाणात यंत्र उपलब्ध झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

निवडणुकीसाठी लागणारी ईव्हीएम यंत्रणा जिल्ह्यातील विविध तहसील कार्यालयांकडून हस्तगत करण्यात आली असून, संपूर्ण यंत्रणा वेळेत आणि सुरक्षिततरीत्या प्राप्त करण्यात आली आहे. एकूण मतदान केंद्रांच्या संख्येच्या किमान १० टक्क्यांपेक्षा अधिक कंट्रोल युनिट उपलब्ध ठेवण्याच्या नियमानुसार, १२६७ मतदान केंद्रांसाठी एकूण १३९७ कंट्रोल युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

बूथनिहाय मतदारसंख्येचा विचार करता, काही मतदान केंद्रांवर दोन, काहींवर तीन तर काही ठिकाणी चार बॅलेट युनिटची आवश्यकता भासते. अंदाजे ७५ ते ८० टक्के मतदान केंद्रांवर चार बॅलेट युनिटची गरज असल्याने, त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय, प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांना सुमारे २० टक्के अतिरिक्त बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात येणार असून, एकूण ५०४५ बॅलेट युनिट मतदानासाठी सज्ज ठेवण्यात येणार आहेत. ईव्हीएम कक्षाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सर्व यंत्रांची तपासणी, सुरक्षित साठवण आणि वितरणाचे नियोजन नियमानुसार करण्यात येत आहे. त्यामुळे आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ही ईव्हीएमच्या पुरेशा उपलब्धतेमुळे कोणत्याही तांत्रिक अडचणीशिवाय यशस्वीपणे पार पडेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# अज्ञानाचा अंधार दूर करणारी ज्ञानज्योती म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले-बसवराज कोरे




छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे अवचित्य साधून आजच महाविद्यालयात वाड्मय मंडळाचेही उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रो. बसवराज कोरे यांना निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. बसवराज कोरे म्हणाले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले या दाम्पत्याने १९व्या शतकामध्ये भारतात एक नवीन क्रांती केली, भारतीय समाज व्यवस्थेने ज्या स्त्री वर्गाला, दिन दलितांना नाकारले होते त्यांना शिक्षण देऊन प्रवाहात आणण्याचे काम या दांपत्याने केले त्याचा परिणाम त्यांना आयुष्यभर भोगावा लागला पण त्याची पर्वा त्यांनी केली नाही .

पुढे बोलताना ते म्हणाले अज्ञानाचा अंधार दूर करणारी ज्ञानज्योती म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिवराव मुळे हे होते त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षाचा मुलानी विचार करावा आणि आपले पाऊल टाकावे, शिक्षणाने जीवनाचा उद्धार होतो असे उद्गगार त्यांनी काढले.

कार्यक्रमात वाडमय मंडळ स्थापित कार्यकारणी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी केलेतर कार्यक्रमाचे प्रस्तावित डॉ. अश्विनी कुमार चिंचोलीकर यांनी केले व आभार डॉ. नरेश डहाळे यांनी मांडले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. अर्जुन चव्हाण,डॉ. सुखदेव पोटदुखे,डॉ. किशोर काळे, डॉ. इम्रान पठाण, प्रा. हरिदास होळकर, प्रा. लक्ष्मण खरात, डॉ रमेश कचरे डॉ. लावंड, प्रा. माठे, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव आदींनी परिश्रम घेतले.

# शालेय विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञान व आर्थिक व्यवहार कळावे या साठी "आनंद नगरी" उपयुक्त







वैजापूर दि.३ (प्रतिनिधी)- शालेय जीवनात पुस्तकी ज्ञानासोबत शालेय विद्यार्थ्यांना व्यहारिक ज्ञान,आर्थिक व्यवहार व पैशाच्या देवा-घेवीचे ज्ञान व माहिती होण्यासाठी शालेय जीवनातील ''आनंदनगरी'' अत्यंत उपयुक्त असतात असे प्रतिपादन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी शनिवार(ता,०३) रोजी पीएमश्री मौ, आझाद विद्यालयात बालिका दिन व सावित्रीबाई फुले जयंती निमित्त आयोजित ''आनंदनगरी''उदघाटन प्रसंगी काढले.विद्यार्थ्यांचे पालक यांना संबोधित करतांना राजपूत म्हणाले की.''आई-बाबांनी''आपल्या मुलां-मुलींना किराणा खरेदी, किंवा भाजीपाला खरेदी साठी सोबत नेत जावे म्हणजे ही बालके व्यवहारिक ज्ञानाने परिपूर्ण होतील.या आनंद नगरीत विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थ व भाजीपलाचे पन्नास स्टॉल लावले होते यात जवळपास दहा हजार रुपयांची उलाढाल विद्यार्थ्यांनी केल्याचे समजते.

मुख्याध्यापिका नीता पाटील व सहकारी शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांना ही आनंद नगरी आयोजन साठी सहकार्य केले.पालकांनीही मोठ्या प्रमाणात खरेदी केली.या प्रसंगी बी.बी.जाधव,संदीप शेळके, सुभाष गोमलाडू,राजश्री बंड, सुवर्णा बोर्डे,ज्योती दिवेकर,पल्लवी भाकरे,वैशाली पगारे,लता सुखासे, तारा होलप इत्यादिनी सक्रिय सहभाग घेतला.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निम्मित अभिवादन



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर-पालिकेच्या वतीने आज क्रांतीज्योती सावित्री बाई फ ुले यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले.

संभाजी पेठ (औरंगपुरा) येथील सावित्री बाई फुले यांच्या पुतळ्याला मां.सहायक आयुक्त रमेश मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाचे रविंद्र खरात, अतुल बनकर, करण साळवे, इंझमाम उल हक,व स्वच्छता निरीक्षक सचिन मिसाळ आदींची उपस्थिती होती.




**भारतातील पहिल्या शिक्षिका मुख्याध्यापिका श्री शिक्षणाच्या प्रणेत्या विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखविणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्त विनम्र अभिवादन माननीय श्री मनोज उमरीकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अभ्यासिकेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी वाचक वर्ग व जीवन विकास ग्रंथालयातील कर्मचारी उपस्थित होते.**

## राष्ट्रमाता सावित्रीमाई फुलेंना वैजापूरात सर्व थरातील बंधू-भगिनिनी केले अभिवादन

वैजापूर दि.३ (प्रतिनिधी)- सामाजिक क्रांतीच्या अग्रदूत,आद्य शिक्षिका सावित्री-माई फुले यांना १९५व्या जयंती निमित्त शहरातील महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याजवळ शहरातील

सर्व थरातील बंधू-भगिनी यांनी एकत्र येत-शनिवार(ता,०३) सकाळी साडेनऊ वाजता त्यांच्या प्रतिमेला व महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.प्रथम माजी नगर सेविका व महिला आघाडीच्या सुलभाताई भोपळे, माधुरी बनकर,तसेच सुनीता पवार,छाया गायकवाड, वैशाली गायकवाड यांनी पुष्प हार अर्पण करून अभिवादन केले.त्यानंतर जेष्ठ नागरिक एकनाथराव त्रिभुवन, आबासाहेब जेजुरकर, नवनिर्वाचित नगरसेवक राजेश गायकवाड व स्वप्नील गायकवाड ,विनोद गायकवाड यानी ही अभिवादन केले. शाहीर अशोक बागुल,डॉ.संतोष गंगवाल,जगन गायकवाड, दिलीप अनर्थे,बाबासाहेब गायकवाड, अण्णासाहेब ठेंगडे ,व धोंडीरामसिंह राजपूत यांनीही सावित्रीबाई फुले प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.शिव-फुले-शाहू--आंबेडकर विचारमंच व अ.भा. समता परिषदेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संचलन धोंडीराम राजपूत यांनी केले तर आभार जगन गायकवाड यांनी मानले.या प्रसंगी आबासाहेब कसबे,विलास म्हस्के,जीवन पठारे,जयप्रकाश बोरगे,एम,आर.गणवीर,संजय अभंग,मोती वाघ,रतीलाल गायकवाड,याशिवाय गिरीश चापानेरकर व शैलेश पोंदे शहरातील सर्व थरातील बंधू-भगिनी यांनी ही अभिवादन केले. सूत्र संचलन धोंडीराम राजपूत तर आभार जगन गायकवाड यांनी मानले.

# बालिकांचा सन्मान हाच देशाचा सन्मान, राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले जयंती अभिवादन व बालिका दिनी -डी.डी.राजपूत



वैजापूर दि.३ (प्रतिनिधी)- येथील पीएमश्री मौलाना आझाद पालिका विद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या १९५व्या जयंती निमित्त अभिवादन व बालिका दिन निमित्त बलिकांचा सन्मान

सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत शनिवार (ता,०३)रोजी करण्यात आला,या प्रसंगी राजपूत म्हणाले की,''बालकांच्या जन्माचे स्वागत, मुलगा मुलगी समान समजणे व बलिकांचा सन्मान करणे हा देशाचा सन्मान करणे आहे''.परिवारात मुलींचा सन्मान सर्वांनीच करावयास हवे असेही ते पुढे म्हणाले. या प्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ.नीता पाटील होत्या तर शाळेतील मुलींच्या असंख्य माता,भगिनी उपस्थित होत्या.प्रथम राजपूत यांच्या हस्ते सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्तविक शिक्षिका तारा होलप यांनी तर सूत्र संचलन लता सुखासे यांनी केली.प्रसंगी पर्यवेक्षक बी.बी.जाधव, राजश्री बंड, सुवर्णा बोर्डे, सुभाष गोमलाडू,संदीप शेळके, ज्योती दिवेकर, वैशाली शेलार,सुनीता वसावे, श्रीमती राजपूत,यांची उपस्थिती होती.

(पान १ वरून)

## अजित पवारांना सोबत घेतल्याचा...

त्यावेळी त्याच्याएवढी उंची असलेल्या कोणी तरी येऊन बोलावे असे अपेक्षित असते. भाजप शिस्तीचा पक्ष आहे. कोणी आरोप केले, तर त्याचे उत्तर कोणी द्यावे, याचे काही ताळतंत्र, नियम आम्ही ठेवले आहेत. त्या नियमाप्रमाणे आम्ही वागतो. सिंचनामध्ये ७० हजार कोटींचा घोटाळ्याचा आरोप करणाऱ्यांमध्ये सत्तेत सहभागी आहे असे अजित पवार यापूर्वी कधी म्हटले नाहीत. आता सल्ला देणारी संस्था बदलली आहे. त्यामुळे या संस्थेला माहिती कमी असेल'.

पवार यांना काही संस्था स्क्रिप्ट लिहून देतात. आज कोणता शर्ट घालायचा, तो लकी आहे. हे वाक्य म्हटले तर चांगली प्रसिद्धी होईल. या सर्व गोष्टी संस्था करतात. संस्था भाड्याने घेतल्या जातात. त्यांच्याकडे प्रचंड पैसा आहे. त्यामुळे हजारो लोकांना कंपन्यात बसवून 'ट्रोल' करायला पैसे दिले जातात. मी, माझा पक्ष किती प्रसिद्ध आहे, हे सांगण्याचे काम करतात. त्यांच्याकडून 'स्क्रिप्ट'चे वाचन केले जाते, असेही चव्हाण म्हणाले.

## फ्लड डायव्हर्शनचा पहिला टप्पा...

पहिला प्रोजेक्ट राबवण्याचा निर्णय घेतला. २ टप्प्यांत होणाऱ्या या प्रकल्पावर ४ हजार कोटींचा खर्च होणार आहे. त्याचा सांगलीतील पहिला पहिला टप्पा लवकरच सुरू होणार आहे. त्यासाठी ५९१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे पुराचे पाणी शहरात न येता पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागात वळवण्यात येईल. यामुळे एकीकडे आपल्या शहरांना पुराच्या पाण्यामुळे संरक्षण मिळेल आणि दुसरीकडे दुष्काळी भागाला त्या पाण्यामुळे शेतकऱ्याला जिवनदान मिळेल.

आपल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले. याबाबतीत आपण दुसऱ्या क्रमांकावर आहोत. आज महाराष्ट्रातील ५० टक्के लोकसंख्या शहरात राहते. ६ कोटी लोकं ४० हजार गावांत राहतात आणि ६ कोटी लोकं ४०० शहरांत राहतात. ६ कोटींपैकी साडेचार कोटी लोकं सांगलीसारख्या २९ शहरांत राहतात. त्यामुळे शहरांत राहणाऱ्या लोकांच्या जिवनात सकारात्मक बदल घडवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले, मागील ७० वर्षांत गावांचा विकास म्हणजे देशाचा विकास ही भूमिका मांडण्यात आली. ही भूमिका चूक नव्हती. पण ही भूमिका मांडताना आपण भारतात शहरेही आहेत याचा विसरलो. शहरांतही लोकं राहतात. त्यांच्यासाठीही मुलभूत सोयीसुविधा केल्या पाहिजेत. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार यासाठी गावातील लोक शहरात येत आहेत. यामुळे शहरांच्या गरजा वाढत आहेत. शहरात लोक आले की, त्यांना राहण्यासाठी जागा मिळत नाही. त्यातून अतिक्रमणे होतात. झोपडपट्ट्या तयार होतात. लोक जागा मिळेल त्या ठिकाणी बसतात. पिण्याच्या पाण्याचे प्रश्न निर्माण होतात. घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण होतात.

पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे ७० वर्षे आपण शहरांसाठी काहीच केले नाही. पण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सरकार आल्यानंतर शहरीकरणाला अभिशाप न समजण्याचे निर्देश दिले. शहरांमध्ये व्यवस्था उभ्या करण्याचा सल्ला दिला. देशाचा ६५ टक्के जीडीपी शहरात तयार होतो. वस्तु व सेवांची निर्मिती, रोजगारांची निर्मिती ही शहरात होते. त्यामुळे शहरातील मध्यमवर्गीय व गरिबांचे जीवनमान उंचावेल अशा व्यवस्था निर्माण केल्या तर आपली शहरे हीच पुढच्या काळात विकासाचे केंद्र बनतील. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदा देशात शहराच्या विकासासाठी योजना उभ्या केल्या. त्यासाठी पैसे देणे सुरू केले. त्यातून शहरांना लाखो कोटींचा निधी उपलब्ध होण्यास सुरुवात झाली.

एकट्या महाराष्ट्राला ३० ते ३५ हजार कोटी रुपये दिले. त्यातून पिण्याचे पाणी, भुयारी गटार, कचऱ्याचे व्यवस्थापन आदी विविध योजना अंमलात आणल्या गेल्या. यामुळे महाराष्ट्रातील शहरे बदलू लागली, असे फडणवीस म्हणाले.

## भाजपच्या बिनविरोध पॅटर्नची...

१३ दिवस बाकी आहेत. मात्र, या निवडणुकांआधीच राज्यभरात एकूण ७० उमेदवारांची नगरसेवकपदी बिनविरोध निवड झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यामध्ये भाजपाचे सर्वाधिक ४४ बिनविरोध नगरसेवक भाजपचे आहेत. दरम्यान, याच बिनविरोध विजयी नगरसेवकांबाबत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी तीव्र शब्दात खंत व्यक्त केली आहे. माझ्या उभ्या आयुष्यात अशी निवडणूक कधी मी पाहिली नाही. बाळासाहेब ठाकरेंसोबत अनेक निवडणुका पाहिल्या, पण अशी निवडणूक जी इतक्या उमेदवारांना बिनविरोध करते. ही परिस्थिती पहिल्यांदाच मी पाहतोय, असं राज ठाकरे म्हणाले. ठाण्याचे शहराध्यक्ष अविनाश जाधव , अभिजीत पानसे आणि माजी आमदार राजू पाटील आज राज ठाकरेंच्या शिवतीर्थ या निवासस्थानी भेटीसाठी आले होते. या भेटीदरम्यान, राज ठाकरेंनी बिनविरोध निवडीवरुन हे वक्तव्य केलं आहे.

## ठाकरे बंधूंच्या जाहीरनामा म्हणजे...

२५ हजार ते १ लाख रुपयांपर्यंत रोजगार सहाय्यता निधी, कोळी महिलांना १० रुपयात जेवण आदी बाबींचा समावेश आहे.

मात्र, यातील बहुतांश वचने केवळ महापालिकेत बसून पूर्ण करता येणार नाहीत, असे शेवाळे म्हणाले. मुंबईकरांच्या घरांबाबत त्यांनी दिलेल्या आश्वासनाला कोणताही कायदेशीर आधार नाही. मुंबई महापालिका अधिनियम १८८८ अंतर्गत मुंबईकरांसाठी घरे बांधण्याची तरतूद नाही. तो राज्य शासनाचा अधिकार आहे. धोरण बनवण्याचे झाल्यास नगर विकास खात्याची परवानगी लागेल, तसेच विधि मंडळात बहुमत हवे, असे राहुल शेवाळे यांनी सांगितले.

७०० चौरस फूट मालमत्तेवरील कर माफ करण्याचा हक्क नगर विकास विभागाला आहे. १०० युनिट वीज मोफत देण्याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य वीज नियामक आयोगाला आहेत. मुंबई महापालिकेला नाही. तसेच नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यासाठी राज्य सरकार व नॅशनल मेडिकल कमिशनची परवानगी आवश्यक आहे. मात्र कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यासाठी महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची मान्यता घ्यावी लागेल, असे शेवाळे म्हणाले.

सुरक्षित नियोजित पार्किंग सुविधा देणे, ही महापालिकेची जबाबदारी होती. मात्र त्यांच्या काळात पार्किंग स्टेशन उभारलेले नाही, विकासकाच्या फायद्याचे निर्णय घेऊन भ्रष्टाचार झाला, याची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी शेवाळे यांनी केली. पालिकेच्या अखत्यारित ज्या गोष्टी येत नाहीत, त्या सादर करून मतदारांची दिशाभूल करण्यात आली. म्युच्युअल फंड गुंतवणुकीबाबत जसा सेबीचा सावधानतेचा इशारा असतो, त्याप्रमाणे मतदारांनीही सावध राहून उबाठा-मनसे उमेदवारांना मतदान करण्यापूर्वी विचार करावा, फसवणूक झाल्यास निवडणूक आयोग जबाबदार राहणार नाही, असे शेवाळे म्हणाले.

## महायुतीत वादाची ठिणगी?...

टीका केली.

''मी आता असं म्हणेन की, 'ये घरला जायचयं का?' असं म्हणणाऱ्यांना मी सांगतो की, मुख्यमंत्री पण आमच्याकडे आहेत आणि गृहमंत्री पण आमच्याकडेच आहेत. त्यामुळे दमात घेऊ नका आणि हलक्यात पण घेऊ नका'', असा अप्रत्यक्ष इशारा चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांना दिला आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड येथे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर आरोप केले होते. त्या आरोपांना चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिलं. यावेळी रवींद्र चव्हाण म्हणाले की, 'अजित पवार यांनी पहिल्यांदा स्वत:च्या पक्षाकडे पाहिलं पाहिजे. 'खुदके गिरेबान में झांकना चाहिये' अशी एक म्हण हिंदीत आहे. आम्ही आरोप केले तर अजित पवारांच्या अडचणी वाढतील' अशा शब्दांत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अजित पवार यांना शनिवारी इशारा दिला.'पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील पक्षाबद्दल आपण बोलत आहोत, हे त्यांनी ध्यानात ठेवावं.'

## पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या....

जागा वाढल्या आहेत. दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रत्येकी ३० जागा वाढल्या आहेत. एमडी पेडियाट्रिक्स, एमएस जनरल सर्जरीच्या प्रत्येकी १७ जागा, एमएस ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकोलॉजीमध्ये १४ जागा, व्हेनेरिओलॉजी अँड लेप्रसीमध्ये ८ जागा, एमएस ऑर्थोपेडिक्स, एमडी पॅथॉलॉजीमध्ये प्रत्येकी ४ जागा, एमडी डर्मिटोलॉजी, एमडी इमर्जन्सी मेडिसिन, एमडी इम्युनोहेमॅटोलॉजी अँड ब्लड ट्रान्सफ्युजन, एमएस ऑप्थाल्मॉलॉजीमध्ये प्रत्येकी ३ जागा, एमडी ॲनाटॉमी, एमडी कम्युनिटी मेडिसिन, एमडी मायक्रोबायोलॉजी, एमडी रेस्पिरेटरी मेडिसिन, एमडी फार्माकॉलॉजी, एमडी फिजिओलॉजीमध्ये प्रत्येकी २ जागा, एमडी सायकिॲट्री आणि एमडी स्पोर्ट्स मेडिसिनमध्ये १ जागेला मंजुरी मिळाली आहे.

गुजरातमध्ये ४ महाविद्यालये, महाराष्ट्र,तामिळनाडू ६,उत्तर प्रदेश, राजस्थानमध्ये प्रत्येकी २, कोलकाता, आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, दिल्ली, सहनपूर, पद्दुचेरी, हरियाणा या राज्यांमध्ये वाढणार जागा.

## वाजपेयी, मोदी, वसंतदादा,....

फोन रेकॉर्ड चेक करा त्यांना कोणाचे फोन गेला, २४ तासात आले, कोणत्या पालकमंत्र्याचे, कोणत्या मंत्र्याचे कोणत्या कार्यालयातून फोन आले याची चौकशी झाली तर या बिनविरोध माघारीच रहस्य तुम्हाला कळेल, असेही राऊत म्हणाले. राऊत यांनी सांगितले की, या घटनांमुळे महाराष्ट्राची प्रतिष्ठा धुळीस मिळाली आहे. महाराष्ट्र पूर्ण बदनाम झाला असून महाराष्ट्राची प्रतिष्ठा धुळीस मिळाली आहे. ६०-६० लोक बिनविरोध होत असतील, तर ही काय निवडणूक आहे? मतदारांनी करायचं काय मग? जर हे विकले गेले असतील किंवा दबावाने मागे घेतले असतील तर त्या त्या भागातील मतदारांनी काय करायचं? अशीही विचारणा त्यांनी केली. हा प्रश्न निवडणूक आयोगाला कधी पडलाय का? निवडणूक आयोग या भ्रष्टाचाऱ्यांच्या ताटाखालचं मांजर झालं, हे पाळीव मांजर असल्याचा हल्लाबोलही त्यांनी केली.